# अखेर तू येशीलच

म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
दा.क्र.: २३७६९



IRBK-0123769

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सरस्वती मंदिर, सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समोर
ठाणे-४०० ६०१
दूरध्वनी - २५४०६७८७

# अखेर तू येशीलच

सुरेश खरे

प्रज्ञा प्रकाशन
अ/१५, "शकुन", शहाजी राजे मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.
दूरध्वनी : ६३४०९८१

IRBK-0123769

IRBK-0123769

क्र. २३७६६ २६।५।९९
दि. ६।१२।९७

## अंक पहिला [दृश्य — १.]

[ एका सधन सुखवस्तु घराचा दिवाणखाना. सजावटीवरून वैभवाची आणि तरीही उच्च अभिरुची आणि खानदानी संस्कृती यांची साक्ष पटावी. एकूणच हे घर प्रसन्न वाटावं. वातावरणावर सुख आणि प्रसन्नता यांच्या खुणा. प्रकाश येतो तेव्हा ७० च्या आसपास असलेल्या खानदानी राजस व्यक्तिमत्वाच्या आई कुठचीतरी पोथी की स्तोत्र वाचीत आहेत. त्यांची सून उषा फोनवर बोलत आहे. ]

**उषा :** बस बस खूप झालं. इतकं गयावया करायची काही गरज नाही... का नाही वाईट वाटणार? साऱ्या दुनियेनं फोनवर मला गुड विशेस् दिल्या. आणि तुला उषा वहिनींची आठवण नाही झाली? [किचनमधून पिंकी वय वर्षे १० प्रवेश करते.] हे बघ ते काही तू मला सांगू नकोस. पिंकीनं सकाळपासून घोशा लावलाय. सर केव्हां येणार.... सर केव्हां येणार?

**पिंकी :** मम्मी, मम्मी सर आहेत?

**उषा :** [ फोनवर बोलता बोलता ] होय, [ परत फोनवर ] हे बघ राहुल, इतक्या उशीरा विश् केलेलं मला चालेल. पण पिंकीच्या टयुशनला दांडी मारलेली मला नाही खपायची. सांगून ठेवते. .. एक दिवसाचा पगार कापीन तेव्हां समजेल तू कुठून बोलतोयस ?. छान. तू स्वत.ला समजतोस तरी कोण? काही लाज लज्जा....? इथं आम्ही तुझी सकाळपासून वाट पाहतोय आणि तू शिष्टासारखा खालून हॉटेलमधून फोन करतोयस. हे बघ पाच मिनिटात तू इथं हजर झाला नाहीस तर नुसत्या विशेस् देऊन भागणार नाही. चांगली महागडी भेट दयावी लागेल. .. मग ठेवू फोन?

**पिंकी :** मम्मी मला बोलायचंय.

**उषा :** एक मिनीट.. राहुल पिंकीशी बोल [पिंकीकडे फोन देते आणि किचनमध्ये जाते.]

**पिंकी :** [फोनवर] सर सर तुम्हाला गम्मत सांगायची आहे. एक नवीन पझल एक मिनीट हं आठवते... काय बंर... ?

**उषा :** [बाहेर येत] आई, दूध गरम करून फ्रिजमध्ये ठेवलं होतं तरी ते नासलं.

**आई :** असं कसं झालं?

**पिंकी :** [एकदम] हं सर. दूध नासू नये म्हणून काय करायचं? हं. सांगा काय

**ऋणनिर्देश** - सुरेश राजदा यांच्या 'अग्निपथ' या गुजराती नाटकावर आधारित.

*'अखेर तू येशीलच' या नाटकाचे भाषांतर, रुपांतर नभोनाट्य, दूरदर्शन-नाट्य, चित्रपट, प्रयोग वगैरे सर्व हक्क **'एसके ॲन्ड असोसिएटस्'**, २-बी, स्टेला मारिस, सितलादेवी टेंपल रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६ याजकडे आहेत. लेखी पूर्वसंमती शिवाय या नाटकाचा किंवा त्यातील कोणत्याही भागाचा वापर केल्यास कायदेशीर इलाज केला जाईल.*

*- सुरेश खरे*

**प्रकाशक**
गिरीश दत्तात्रय गाडगीळ
प्रज्ञा प्रकाशन
विलेपार्ले (पूर्व)
मुंबई-४०० ०५७

**प्रथमावृत्ती**
फेब्रुवारी, १९९०

**मुखपृष्ठ**
शैलेश तेंडोलकर

**मूल्य**
३० रूपये

**मुद्रक**
व्यासा आर्टस्
शिवशक्ति इंडस्ट्रियल इस्टेट
मरोल, अंधेरी (पूर्व)
मुंबई-४०० ०५९

'अखेर तू येशीलच' या नाटकाचा प्रथम प्रयोग शनिवार दिनांक २९ जुलै, १९८९ रोजी दुपारी ४.०० वाजता शिवाजी मंदिर, दादर येथे इंडियन नॅशनल थिएटर या संस्थेतर्फे सादर करण्यात आला. त्यात भाग घेणारे कलावंत

| | | | |
|---|---|---|---|
| उषा | : **रिमा लागू** | पिंकी | : **मेधा मटकर** |
| आई | : **विमल भातखंडे** | सुजाता | : **माधवी गोगटे** |
| भदे | : **लिलाधर कांबळी** | शालू | : **ज्योती शेवडे** |
| राहुल | : **रमेश भाटकर** | प्रभाकर | : **रविकांत तुळसकर** |
| वासू | : **राजन महाडिक** | आगंतुक | : **श्रीराम दाते** |
| देशपांडे | **रामकृष्ण गाडगीळ** | इन्स्पेक्टर | : **दिनकर गावडे** |
| हरी | **सदाशिव चव्हाण** | ड्रायव्हर | : **शंकर गायकवाड** |

⊠ ⊠ ⊠

| | | | |
|---|---|---|---|
| दिग्दर्शक | **सुरेश राजदा** | नेपथ्य | : **विजय कापडिया** |
| प्रकाश | **गौतम जोशी** | ध्वनि | : **नंदलाल रेळे** |
| रंगभूषा | **बाबूलनाथ कुडतरकर** | वेशभूषा | : **अपरा मेहता** |
| सहाय्यक | **विजय केळुसकर**<br>**वसंत केळुसकर** | रंगमंच | : **सदाशिव चव्हाण**<br>**शाम विश्वासराव**<br>**शंकर गायकवाड** |

निर्मिती सहाय्यक
**सुधीर करंगुटकर**

निर्मिती प्रमुख
**विनायक आयरे**

⊠ ⊠

क्रा. २३७६९ २६।५।९१
नि. ३।।२९

# अंक पहिला [दृश्य ... १.] .....

[ एका सधन सुखवस्तु घराचा दिवाणखाना. सजावटीवरून वैभवाची आणि तरीही उच्च अभिरूची आणि खानदानी संस्कृती यांची साक्ष पटावी. एकूणच हे घर प्रसन्न वाटावं. वातावरणावर सुख आणि प्रसन्नता यांच्या खुणा. प्रकाश येतो तेव्हा ७० च्या आसपास असलेल्या खानदानी राजस व्यक्तिमत्वाच्या आई कुठचीतरी पोथी की स्तोत्र वाचीत आहेत. त्यांची सून उषा फोनवर बोलत आहे ]

**उषा :** बस बस खूप झालं. इतकं गयावया करायची काही गरज नाही. का नाही वाईट वाटणार? साऱ्या दुनियेनं फोनवर मला गुड विशेस् दिल्या. आणि तुला उषा वहिनींची आठवण नाही झाली? [किचनमधून पिंकी वय वर्षे १० प्रवेश करते.] हे बघ ते काही तू मला सांगू नकोस. पिंकीनं सकाळपासून घोशा लावलाय. सर केव्हां यणार.. . सर केव्हां येणार?

**पिंकी :** मम्मी, मम्मी सर आहेत?

**उषा :** [ फोनवर बोलता बोलता ] होय, [ परत फोनवर ] हे बघ राहुल, इतक्या उशीरा विश् केलेलं मला चालेल. . पण पिंकीच्या टयुशनला दांडी मारलेली मला नाही खपायची.... सांगून ठेवते. एक दिवसाचा पगार कापीन तेव्हां समजेल. तू कुठून बोलतोयस ? छान. तू स्वत:ला समजतोस तरी कोण? काही लाज लज्जा....? इथं आम्ही तुझी सकाळपासून वाट पाहतोय आणि तू शिष्टासारखा खालून हॉटेलमधून फोन करतोयस.... हे बघ पाच मिनिटात तू इथं हजर झाला नाहीस तर नुसत्या विशेस् देऊन भागणार नाही. चांगली महागडी भेट दयावी लागेल. .. मग ठेवू फोन?

**पिंकी :** मम्मी मला बोलायचंय.

**उषा :** एक मिनीट... राहुल पिंकीशी बोल [पिंकीकडे फोन देते आणि किचनमध्ये जाते.]

**पिंकी :** [फोनवर] सर सर तुम्हाला गम्मत सांगायची आहे.. एक नवीन पझल एक मिनीट हं आठवते... काय बंर. . ?

**उषा :** [बाहेर येत] आई, दूध गरम करून फ्रिजमध्ये ठेवलं होतं तरी ते नासलं.

**आई :** असं कसं झालं?

**पिंकी :** [एकदम] हं सर. दूध नासू नये म्हणून काय करायचं? हं. सांगा काय

करायचं?

**उषा :** संपलं की नाही अजून तुमचं?

**पिंकी :** एक मिनीट मम्मी ... सांगा ना सर. . दूध नासू नये म्हणून काय करायचं?

**आई :** त्याला काय सांगता येणार? [पिंकी मोठयाने हसते.]

**उषा :** काय गं काय झालं? काय म्हणाले सर?

**पिंकी :** सर म्हणाले 'दूध नासायला नको असेल तर ते गाईच्या पोटातच ठेवायचं... सर . . फोन ठेवते लवकर या.. [फोन ठेवते. किचनमधून सुजाता बाहेर येते ]

**सुजाता :** या दादाचं हे नेहमीचंच आहे

**उषा :** तुला काय झालं रागवायला?

**सुजाता :** वाजले किती? नऊ वाजायला आले. दादाला काही आहे का त्याचं. आज तुझा वाढदिवस जेवून सगळयांनी बाहेर पडायचं त्याच्या लक्षात असलं म्हणजे मिळवलं.

**उषा :** येतील.

**सुजाता :** हो. .

**उषा :** पिंकी आत जाऊन ड्रेस बदल जा. बेडवर कपडे काढून ठेवले आहेत. [पिंकी आत जाते.]

**सुजाता :** वहिनी आज राहुल नाही आला शिकवणीला... ?

**उषा :** आताच त्याचाफोन आला होता. येतोय थोडयाच वेळात....[बाहेरून श्री. व सौ. भदे यांच्या भांडणाचा आवाज. भदे दांपत्य प्रवेश करतं. .. सुजाता आत जाते.]

**उषा :** या... ॲडव्होकेट भदे या.... या शालूताई...

**भदे :** बघा, तुम्हाला माहित आहे मी कोण आहे. मला माहित आहे. पण हिला माहीत नाही. सांगा तिला.... तुम्ही तरी सांगा. म्हणावं या अर्जावर सही कर.

**आई :** आज असं काय झालं भदे?

**भदे :** व्हायचं काय कपाळ? गेले महिनाभर मी हिच्या मागे आहे, 'बाईग, ह्या डायव्हर्स पेपर्सवर सही करून टाक.... म्हणजे तूही सुटलीस आणि मीही सुटलो.' पण ही सही राहिली बाजूलाच. हातात असेल ती वस्तू माझ्या अंगावर फेकते. रोज संध्याकाळी हे असं शूटींग आमच्याकडे चालू असतं.

**उषा :** पण इतके दिवस तुम्ही कधीच हे बोलला नाहीत.

**भदे :** नाही बोललो. कशासाठी बोलायचं? हिचा नेम चुकत होता. पण आता तीन वर्षाच्या प्रॅक्टीसनं नेम बरोबर बसायला लागलाय.

**आई :** काय हे भदे? शोभतं का तुम्हाला हे दोघांना?

**शालू :** आता तुम्हीच बघाना गेले महिनाभर मी जिथं जाईन तिथं हातात डायव्हर्सचे पेपर्स घेऊन मागे मागे येतात. बाथरूम, म्युझिक क्लासपासून ते अगदी मार्केट मध्ये सुध्दा. ''याच्यावर साईन कर.... याच्यावर साईन कर....''

**आई :** भदे, तुम्हा दोघांचंही हे दुसरं लग्न. खरं म्हणजे तुम्ही दोघांनी शहाणपणानं, समजूतदारपणानं वागायला हवं.

**भदे :** खरं सांगू आई, दोन्हीवेळा मी कमनशिबी ठरलो.

**आई :** ते कसं?

**भदे :** पहिल्यावेळेला ती पळून गेली म्हणून आणि आता ही पळून जात नाही म्हणून.

**शालू :** आणि मी? मी डब्बल कमनशिबी. पहिला नवरा वकील आणि दुसरा तरी चांगला मिळवा? तोही वकील!

**भदे :** मग टाक याच्यावर सही करून. पहिला सुटला तसा हा दुसराही सुटून जाईल.

**शालू :** म्हणजे मी इतर बायकांच्यापाठीमागे फिरायला मोकळा.

**भदे :** पाहिलंत? पाहिलात हिचा संशयी स्वभाव? आणि म्हणून मला घटस्फोट हवाय. आई, आज सकाळची गोष्ट.... सकाळी ही प्रॅक्टिस करीत होती.... नृत्याची - भरतनाटयम् ! मी मोठया कौतुकानं म्हटलं, ''बाई ग, तुझं नृत्य हे जगातलं आठवं आश्यर्च आहे.'' नाचता नाचता ब्रेक लागल्यासारखी ही थांबली. आणि माझा दंड पकडून विचारलं, ''खरं सांगा बाकीच्या सातजणी कोण?''

**शालू :** तुमचं वागणंच तसं आहे. डान्स टीचर, म्युझिक टीचर एवढंच काय, भाजीवाली सुध्दा मला बदलायला लागली. एकदा नाही सहावेळा.

**भदे :** सात वेळा.

**शालू :** बघा ! खरं म्हणजे घरची छिद्र बाहेर कुठं सांगायची? पण गेल्या तीन महिन्यात एक छदाम दिला नाही घरात. बाहेर उडवले सगळे कुणाकुणावर. घराच्या खिडक्यांना पडदे नाहीत आज तीन महिने झाले कानी कपाळी ओरडतेय मी. ''खिडक्यांना पडदे नाहीत, पडदे आणा.. '' मी कपडे कुठे आणि कसे बदलायचे?

**भदे :** तू कुठंही कपडे बदल ना. तुला कपडे बदलताना पाहून शेजारीचं आपल्या खिडक्यांना पडदे लावून घेतील

**आई :** शी शी. भदे. .. काहीतरी भान ठेवा बोलताना...

**भदे :** माफ करा आई, पण माझा निश्चय आता पक्का झालाय. या बाई बरोबर मला संसार करायचा नाही. काल मी पेपरात जाहिरात पण दिलीय. '' पत्नी

पाहिजे!''

**उषा :** म्हणजे वधू पाहिजे. !

**भदे :** तोच तर घोळ झाला ना? पत्नी पाहिजे म्हणून जाहिरात दिली उत्तर म्हणून ढीगभर टेलिग्राम्स आले. प्रत्येकात एकच वाक्य... ''माझी पत्नी घेऊन जा.. माझी पत्नी घेऊन जा....''

**शालू :** हे पहा, मी काही तुमची पहिली बायको नाही पळून जायला. मी अशी नाही सोडणार. पेपरात तुमचा फोटो देईन. खाली सूचना '' या इसमाशी कुणीही लग्न करू नये. केल्यास.... वगैरे वगैरे.... त्या खाली सही. शालिनी.... केअर ऑफ दाऊद इब्राहिम. ..[सुजाता प्रवेश करते.]

**सुजाता :** काय शालूताई, कशी चाललेय डान्सची प्रॅक्टिस?

**शालू :** डान्स ना.

**भदे :** मी सांगतो.... मला विचारा ...मेरे पनघट पे. उजव्या हातानं डान्स टीचरला उडवलं... नंदलाल.. डावा हात तबलजीच्या थोबाडावर. एक लाथ सारंगीवाल्याला.... दुसरी सोफ्याच्या पेकाटात... इथं पहिलं कडवं संपतं..

**सुजाता :** हे काय काका, उगीच थट्टा करता. शालूताई खरंच चांगला डान्स करतात.

**शालू :** खरं तर नृत्य माझ्या रक्तात आहे.

**भदे :** आहे ना, आहे. प्रॉब्लेम फक्त ब्लड सर्क्युलेशनचा आहे.

**शालू :** पाहिलंत? पाहिलंत उषाताई.

**उषा :** जाऊ दे हो ! उगीच चिडवताहेत तुम्हाला. तुम्ही नका लक्ष देऊ.... [राहुल प्रवेश करतो. हातात फुलांचा गुच्छ]

**राहुल :** मे आय कम इन? [दारातच उभा]

**सुजाता :** वेट अ मिनीट. .. वहिनी, या लेटकमरला आत येऊ द्यायचं का?

**उषा :** येऊ दे. काय करणार?

**राहुल :** छान स्वागत करताय आमचे. वाढदिवस कुणाचा? अडवतंय कोण?

**आई :** पुरे सुजू. त्याला दम तरी टाकू दे.

**शालू :** एक मिनीट. .. वाढदिवस कुणाचा आहे?

**राहुल :** उषा वहिनींचा. [उषाला गुच्छ देत. ] मेनी हॅपी रिटर्नस् ऑफ द डे

**भदे :** अरे. आपल्याला कुणी सांगितलंच नाही. उषा वहिनी, हॅपी बर्थ डे

**राहुल :** सुजाता पिकींला सांग, उद्या सुटी नाही. रविवार असला तरी. उगाच माझा पगार कुणी कापायला नको.

**आई :** कोण कापतंय तुझा पगार? तू इतका मन लावून आणि छान शिकवतोस की आहे

हाच पगार कमी आहे.

**शालू :** चला मी बाई निघते. हजार कामं पडली आहेत..

**सुजाता :** शालूताई तुम्ही कुकींग क्लासला केव्हां जाणार आहात?

**शालू :** कां?

**सुजाता :** नाही. मला यायचंय तुमच्याबरोबर. मी पण जॉईन करीन म्हणते.

**शालू :** बरं बरं.... [जाते]

**भदे :** अहो, अहो .... प्रश्नाच उत्तर तर दया. गेली ..

**सुजाता :** हे काय ? कुकिंग क्लासचं नाव काढल्याबरोबर शालूताई एकदम निघून का गेल्या ? उत्तर न देता.

**भदे :** दुसरं काय करणार?

**सुजाता :** कां?

**भदे :** तुम्हाला माहीत नाही वाटतं? कुकींग क्लासची भानगड? गेल्या गुरूवारची गोष्ट.... रवा मंदाग्नीवर भाजून काढण्याऐवजी यानी अख्खा क्लास मंदाग्नीवर भाजून काढला. चक्क आग लावली. चुकून हं! जाऊ दे. आता मात्र मी निघतो. पण हे मी सांगितल्याचं सांगू नका. नाहीतर मला ती मंदाग्नीवर भाजून काढेल. [जातात.]

**आई :** दोघंही नवराबायको स्वभावानं चांगली आहेत. पण सारखी भांडतात. भदे तर प्रभाकर बरोबर शाळेतच होते. शाळेपासून दोघांचं गूळपीठ आहे.

**राहुल :** फुलं आवडली?

**उषा :** खूप. पण आधी एक सांग इतका वेळ होतास कुठे?

**आई :** अग अडकला असेल कुठंतरी. ही मुंबई आहे. थोडं इकडे तिकडे व्हायचंच.

**सुजाता :** त्याला आठवणच नसेल. आई, नाहीतर माणूस फोन तरी करेल नाही का? जा. आधी आत्ताच्या आत्ता वहिनींकरता छानसं प्रेझेन्ट घेऊन ये.

**राहुल :** अस्सं? ठीक आहे... [खिशातून डबी काढतो. उषाला देतो.] धिस इज युअर बर्थ डे प्रेझेन्ट.. .

**सुजाता :** तू खरंच प्रेझेन्ट आणलंस की काय?

**उषा :** हे काय राहुल? याची खरंच गरज नव्हती.

**आई :** अरे तू तर घरचाच. उषाहून लहान. तू नाही अशी भेट आणायची.

**राहुल :** छोटीशी भेट आहे उषावहिनी. ''नाही'' म्हणायचं नाही.

**उषा :** अरे पण.... [वरचा कागद काढते.]

**राहुल :** प्लीज. .. [उषा डबी उघडते.]

**उषा :** राहुल हे काय? ही काय छोटीशी भेट झाली? इतकी महागडी वस्तु आणायची?

**सुजाता :** बघू बघू.. [हातात घेते] वाऽ....

**उषा :** यांना कळलं तर खरडपट्टी काढतील माझी. अरे मी केवळ तुझी थट्टा केली.

**राहुल :** तुम्ही केलेली थट्टा मला खूप आवडते. आपण खूष आहोत.

**उषा :** हे बघ.. . हे अती झालं. .. मी नाही घेणार ही.

**आई :** तुला वेड लागलंय की काय राहुल? हिऱ्याची चमकी? वाढदिवसाची भेट म्हणून? कितीला पडली?

**राहुल :** फार महाग नाहीये आई.

**उषा :** म्हणे फार महाग नाहीये तुझ्या भावी पत्नीला दे ही. [राहुल कानात कुजबजतो] शी.. तुझं आपलं काहीतरी. काही लाजलज्जा?

**सुजाता :** काय सांगितले वहिनी? मला सांग ना.. . [राहुल, उषा हसतात.]

**आई :** हे बघ सूनबाई, प्रभाकरला विचारल्याशिवाय इतकी महाग वस्तु नको घेऊस. राहुल, प्रभाकरला येऊ दे. त्याच्याशी बोलायला हवं. सूनबाई मी जेऊन घेते. खूप उशीर झाला की माझ्या घशाशी येतं. राहुल, जेवल्याशिवाय जायचं नाही.

**उषा :** चला, मी वाढते तुम्हाला. बस रे तू. जाऊ नको. आलेच मी थोडया वेळात. [आई आत जातात.]

**राहुल :** ''जाऊ नको'' असं सांगताय की जसा काही माझ्या जाण्या न जाण्यानं फरक पडणाराय..

**उषा :** [नाटकीपणानं] राहुल, तुला कल्पना नाही, पण तू इथं नसलास की मला मुळीच चैन पडत नाही रे. तुझ्या आठवणीत स्वतःला विसरून जाते मी. काही करून तू कायमचा इथंच राहा.

**सुजाता :** वहिनी..

**उषा :** [खळखळून हसते.] बस आता मुकाटयानं जास्ती शहाणपणा नको. [किचनमध्ये जाते.]

**सुजाता :** [निःश्वास टाकते] वहिनी म्हणजे रिअली ग्रेट. काय ॲक्टींग ! कॉलेजात प्राईझेस मिळवली आहेत तिनं. काय घाबरले मी.

**राहुल :** तू का घाबरलीस?

**सुजाता :** इश्श. मला नाही माहीत. [राहुल गप्प] .... ए .. . तुला काय झालं एकदम?

**राहुल :** अं.. ? काही नाही.. .?

**सुजाता :** आज टयुशनला दांडी का मारलीस? तुला माहीत आहे ना, टयुशन जरी पिंकीची असली तरी वाट मी पाहाते. अशानं ती अभ्यासात मागं पडेल.

**राहुल :** [चिडवीत] तुझ्यासारखी मठ्ठ नाही ती.

**सुजाता :** असू दे आम्ही मठ्ठ. पण मठ्ठ माणसाचं एक चांगलं असतं. बिचारी डोळे मिटून शिकवणारा जे शिकवतो ते शिकतात.

**राहुल :** पण जन्मभर शिकवूनसुध्दा काही माणसं मठ्ठच्या मठ्ठ राहतात. तेव्हां शिकवणाराचे काय हाल होत असतील?

**सुजाता :** मग बघूच या! [त्याचा हात पकडीत] जन्मभर या मठ्ठ माणसाची शिकवणी करशील.... सांग ना? [ड्रायव्हर गोपाळ हातात प्रभाकरची बॅग आणि फाईल घेऊन प्रवेश करतो. सुजाता दारापाशी डोकावते.]

**सुजाता :** वहिनी, दादा आला ग. आठवण झाली म्हणायची घराची. [पिंकी आतून येते. बाहेर पळते.] आम्ही नाटकाला जातोय शिवाजी मंदिरला. तू येणार? [राहुल मानेनंच नाही म्हणतो. प्रभाकर प्रवेश करतो. बरोबर पिंकी]

**प्रभाकर :** सांभाळून पिंकी. सुजू.... तिच्या हातातली फाईल घे. त्यात महत्वाचे पेपर्स आहेत. [सुजाता पिंकीकडुन फाईल घेऊ पाहाते.]

**पिंकी :** पण मी नीट ठेवते ना... पण पप्पा आधी एका पझलचं उत्तर द्या. जपानी भाषेत शाळेला काय म्हणतात? माहीत आहे? नाही... ''याशिका'' अमेरीकेत काय म्हणतात माहीत आहे? नाही. ? ''शिकागो.. ''

**प्रभाकर :** आणि काश्मीरमध्ये काय म्हणतात माहीत आहे. ..?

**पिंकी :** नाही.

**प्रभाकर :** शिकारे..

**पिंकी :** सुपर्ब पपा.... [फाईल घेऊन आत जाते.]

**सुजाता :** आम्हाला वाटलं तू बहुतेक विसरलास. ..

**प्रभाकर :** काय विसरायचं? [नाव चटकन आठवत नाही.] अरे.. हो. हा राहुल नाही का?..

**सुजाता :** ते नाही म्हणत मी. .

**प्रभाकर :** हं तर काय म्हणत होतो की.. काय म्हणतंय तुमचं कॉलेज.. ?

**राहुल :** कॉलेज नाही शाळा.

**प्रभाकर :** म्हणजे तुम्ही शाळेत?

**राहुल :** शिकत नाही. .. शिकवतो.

**सुजाता :** कमाल आहे दादा तुझी. तुझ्या एकेक विसराळुपणाच्या गोष्टी सांगितल्या

ना तर.

**प्रभाकर :** ते नंतर आधी भदे काकांना फोन करून बोलाव त्यांना म्हणाव आधी या. जरूरीचं काम आहे आई काय करते?

**सुजाता :** जेवतेय. [सुजाता एकीकडे डायल फिरवते.]

**उषा :** [प्रवेश करते] किती उशीर केलात....?

**प्रभाकर :** अगं कामं संपता संपत नाहीत.

**सुजाता :** दादा, भदे काका.... [रिसिव्हर हातात... नंबर लागलाय.]

**प्रभाकर :** आता कशाला फोन केलाय त्यानं. ?

**सुजाता :** तूच करायला सांगितलास...

**प्रभाकर :** अरे हो.. दे. हॅलो भदे. असशील तसा निघून ये. एक आनंदाची बातमी द्यायचीय. कोणती? . . बोर्डानं माझी मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक केली आहे तू जेव्हां ऑफीसात आलास तेव्हां मी मिटींग मध्ये होतो. ये ये. .. असशील तसा निघून ये... मी वाट पाहतोय.. [फोन ठेवतो.]

**सुजाता :** मॅनेजिंग डायरेक्टर?

**उषा :** केव्हांची गोष्ट?

**प्रभाकर :** अगं आजच.

**राहुल :** हार्टी कॉंग्रेच्युलेशनस् ! इटस् रिअली अ गुड न्यूज !

**आई :** [प्रवेश करते ] केव्हां आलास रे? किती उशीर हा !

**प्रभाकर :** आई, बस अशी इथे. एक आनंदाची बातमी सांगायची आहे. तुझा मुलगा आज कंपनीचा मॅनेजिंग डायरेक्टर झाला. तुझ्या आशीर्वादानं. [नमस्कार करतो.... आई ''आयुष्यमान भव'' म्हणून आशीर्वाद देते] चला मला लगेच निघायला हवं..

**उषा :** अहो आलात, काय नि चाललात काय?

**प्रभाकर :** मी फक्त जाता जाता घरी डोकावलोय तुम्हाला गुड न्यूज द्यायला ..

**उषा :** जाता जाता म्हणजे कुठे चाललात?

**प्रभाकर :** अगं एक जपानी डेलिगेशन आलंय. त्यांना डीनर आहे. मला जायलाच हवं. [भदे येतात.]

**भदे :** कॉंग्रेच्युलेशनस्, माय फ्रेण्ड हार्टी कॉंग्रेच्युलेशन् ! तोंड गोड कर [हातात वडी ठेवतो.]

**प्रभाकर :** हे काय?

**भदे :** हिनं बेसनाच्या वड्या केल्या आहेत आत्ताच. मला तुटता तुटत नाहीत. तुला बघ

जमतंय का? बघ ट्राय कर. वडी नाही तर दात काहीतरी नक्की तुटेल

**आई :** पुरे झालं तुमचं भदे. काय रे मॅनेजिंग डायरेक्टरला काम तरी काय असतं एवढं?

**भदे :** खूप काम असतं. मुख्य म्हणजे आपलं काम दुसऱ्यावर ढकलायचं.

**प्रभाकर :** भदेऽऽ

**भदे :** चला शालूला ही बातमी सांगितली पाहिजे.

**सुजाता :** काय करतायत शालू ताई?

**भदे :** गाण्याचा रियाज चाललाय बाईसाहेबांचा. गाताना डोळे मिटायची सवय आहे तिला. म्हणून तर मी सटकू शकलो.

**सुजाता :** पण गाता गाता त्यांनी मध्येंच डोळे उघडले तर?

**भदे :** शक्यच नाही! गाताना नेहमीच डोळे मिटून घेते ती. हळवी आहे ना. ऐकणाऱ्याला होणाऱ्या यातना तिच्यानं पाहवत नाहीत.

**उषा :** भदे, एक संधी सोडू नका शालूताईंची टर उडवायची.

**प्रभाकर :** तुम्ही बसा बोलत मी निघतो. तुझा वाढदिवस आहे. पण आय ॲम सॉरी.

**सुजाता :** पण नाटकाची तिकीटं...

**प्रभाकर :** अरे हो ती राहिलीच द्यायची. . [खिसे शोधू लागतो.] सापडली ही घे. माझ्या ऐवजी आईला घेऊन जा.

**आई :** नको रे बाबा. मला झोप येते. जागरण नाही सोसत. राहुलची हरकत नसेल तर त्याला घेऊन जा. मी आपली आत जाते. [आत जातात.]

**प्रभाकर :** गुड आयडिया. म्हणजे येताना तुम्हाला सोबतही होईल..

**उषा :** पण परत त्याला चेंबूरला जायचं, सगळं उलट सुलट होईल.

**राहुल :** हरकत नाही. बस ट्रेन काहीतरी मिळेलच...

**प्रभाकर :** इटस फाईन. सो आय मेक अ मुव्ह. भदे यू आर गोईंग टू जॉईन मी. ॲज माय गेस्ट...

**भदे :** अरे पण.

**प्रभाकर :** नो एक्सक्यूजेस. कम ऑन... गेट रेडी.... मी तुझी खाली वाट पाहातो. गुड नाईट एव्हरी बडी. मला यायला उशीर होईल निघू मी? [दोघे जातात.]

**उषा :** [दारापर्यन्त जाते.] उगाच फार उशीर करू नका.

**सुजाता :** वहिनी, आटप लवकर. आज तू माझ्या नवीन साडीची घडी मोडणार आहेस.

**उषा :** अग पण...

**सुजाता :** सॉरी.... यू हॅड प्रॉमिसड्.... आलेच मी. .. [आत जाते.]

उषा : [राहुलला] तुझं जेवण व्हायचंय ना अजून?

राहुल : मला भूक नाहीये.

उषा : बाहेर अरबट् चरबट खालेलं असशील.

राहुल : करेक्ट...

उषा : जवळच्या माणसाचा वाढदिवस असला की आपल्या पंगतीचा लाभ त्यांना द्यावा. त्यांनाही बरं वाटतं...

राहुल : अजून वेळ गेली नाही. तीन तास आपण बरोबरच आहोत. बघू या जवळची माणसं काय लाभ देतात ते.

उषा : झालं, तुझं कोडयातलं बोलणं सुरू?

राहुल : समजून घ्यायचं असेल तर तीन तास शेजारी बसून समजावून देईन. मी सांगायचं तुम्ही समजावून घ्यायच.

उषा : आणि तीन तासातही नाही समजलं तर?

राहुल : इच्छा असली तर तीन तास कशाला तीन मिनिटात माणसाला समजतं. पण समजून घ्यायची इच्छाच नसेल तर उभा जन्मही पुरू शकत नाही. [वासू प्रवेश करतो.]

उषा : काय वासू ? आता काय काम आहे?

वासू : सलाम मेमसाब.... बिल द्यायला आलोय. सलाम साब.

उषा : [बिल घेत....] किती आहे?

वासू : दोनशे सत्तर रूपये सत्तावीस कॅसेटसचे.

उषा : ठीक आहे. तू जा आता. उद्या सकाळी सुजाता कॉलेजात जायच्या आधी ये.

वासू : त्या घरात नाहीत का?

उषा : तुला काय करायचंय?

वासू : काही नाही. त्यांनी एक कॅसेट मागितली होती. नावच विसरून गेलो मी. आहेत घरात?

उषा : सुजाताऽ. .. तू कॅसेट मागविली होतीस एखादी?

सुजाता : मी ? [बाहेर येत] नाही. मी नाही मागविली.

वासू : तुम्ही सकाळी फोन नव्हता केला ?

सुजाता : नाही.... सकाळी नऊला मी बाहेर पडले ती आता संध्याकाळी घरी आले.

वासू : ठीक आहे दुसरं कुणी असेल. इतके फोन येतात. नावही नीट सांगत नाहीत. मग गोंधळ होतो. तुम्ही येताय का दुकानात ?

**उषा :** [आत जाताजाता] दोन मिनिटात...

**सुजाता :** वहिनी, आपल्याला सोबत म्हणून यायचा मेहनतताना म्हणून या साहेबांना जेवण द्यावं लागणार की काय?

**उषा :** ज्यांनी त्याला हे काम सांगितलय ते बघून घेतील. आपल्याला काय करायचंय? [आत जाते.]

**सुजाता :** वहिनी, उगीचच घाबरली. मागून मागून तू काय मागणार? चेंबूरपर्यन्तचं टॅक्सी भाडं किंवा थोडीशी पगारवाढ. जेवण एक्स्ट्रा....

**राहुल :** सॉरी, मला भूक नाही.

**सुजाता :** एक विचारू? दादाच्याऐवजी मी विचारलं असतं तर आला असतात आमच्याबरोबर?

**राहुल :** का नाही? पण मला वाटतं माझं असं येणं सगळयांना आवडलं असतंच असं नाही

**सुजाता :** आवडून घेतलं असतं. पण आम्हाला नीट सांभाळून घरी आणायचं. नाहीतर तू पुढं जाशील आणि गर्दीत आम्ही कुठंतरी हरवून जाऊ.

**राहुल :** मला समजलं नाही.

**सुजाता :** समजून घ्यायचं असेल तर तीन तास जवळ बसायला हवं. मी सांगायचं तू समजून घ्यायचं.

**राहुल :** आणि तीन तासातही नाही समजलं तर... ?

**सुजाता :** समजून घ्यायच असेल तर तीन मिनीटंही पुरतात. पण समजून घ्यायचंच नसेल तर उभा जन्मही पुरत नाही.

**[अंधार : दृश्य समाप्त]**

# अंक पहिला [दृश्य – २]

[त्याच दिवसाची रात्र. वेळ सुमारे साडेबाराची. दिवाणखान्यात आई ज्ञानेश्वरी वाचीत बसल्या आहेत. हरी हातात उशी घेऊन जात असताना.]

**आई :** साहेबांच्या खोलीत पाण्याचा जग् ठेवलास?

**हरी :** जी. पिंकीताईचं दूध पण ठेवलंय.

**आई :** अजून कशी आली नाहीत ही माणसं? साडेबारा वाजून गेले ना?

**हरी :** हो....

**आई :** काळजी करायचं तसं कारण नाही. राहुल आहे सोबतीला. राहुलची गादी घालून ठेव. उशीर झालाय खूप. कदाचित. इथंच झोपेल.

**हरी :** गादी घातलेय.... उशी ठेवतोय. [हरी जातो. बाहेरून शालूताई येतात. थोडयाशा चिडलेल्या.]

**आई :** शालूताई? आताकुठं तुम्ही इथं? वाजले किती?

**शालू :** प्रभाकर पंत नाही आले?

**आई :** अजून कुणीच नाही आलं. उषा आणि मुलं गेली आहेत नाटकाला. भदे प्रभाकर बरोबर गेले आहेत ना?

**शालू :** आता येऊ दे तर खरं.... मग ते आहेत आणि मी आहे.

**आई :** आता काय झालं? मगाशीच तर गोडीगुलाबीनं दोघं इथून बाहेर पडलात. आता काय केलं भदयांनी?

**शालू :** काय केलं नाही विचारा. .. वाचा हे पत्र. तुम्हीच वाचा.... आणि सांगा मला यांच्याशी मी कसं वागायचं.

**आई :** कुणाचं पत्र आहे ? काय लिहीलयं त्यात ?

**शालू :** यांना धमकी दिलीय.... लिहीलंय.... '' नालायक बदमाश माणसा, यापुढं कधी माझ्या बायकोबरोबर जरी नुसता दिसलास तरी याद राख, तंगडी मोडून ठेवीन.''

**आई :** बाई बाई. काय करायचं या भदेना? कमाल झाली बाई. येऊ दे त्यांना. मी सुनावते त्यांना. काळजी करण्यासारखीच बाब आहे ही.

**शालू :** त्यांना चांगलं खडसावून सांगायला हवं.

**आई :** हो. धमकीच दिलेय त्यांनी पण जरा अक्कलहुशारीनं वागायला हवं. मला वाटतं

दहाबारा दिवस तुम्ही दोघं कुठं मुंबई सोडून बाहेरगावी का जात नाही?

**शालू :** मुंबईच्या बाहेर? दोघांनी? झालं ! मला कुठं बरोबर न्यायचं म्हटलं की यांच्या कपाळाला सतराशे साठ आठया पडतात. एकदा केव्हांतरी स्टोव्ह भडकला आणि स्वयंपाकघरात आग लागली. तेव्हां आम्ही दोघांनी खिडकीतून उडया टाकल्या. गेल्या सतरा वर्षात बरोबर बाहेर पडायचा तो पहिला आणि शेवटचा प्रसंग. [बाहेरून उषाचा आणि सुजाताचा आवाज]

**आई :** आली वाटतं माणंसं? [दारापर्यन्त जाते. उषा, सुजाता, राहुल आणि झोपेतली पिंकी प्रवेश करतात.] झोपली वाटतं?

**सुजाता :** टॅक्सीतच झोपली.

**आई :** कपडे बदलून झोपू दे तिला. टेबलावर दूध ठेवलाय हरीनं. [सुजाता आणि पिंकी बेडरूमध्ये जातात.]

**उषा :** बस ना रे राहुल उभा का? [राहुल बसतो.] आई, ह्यांचा फोन आला होता?

**आई :** नाही.

**उषा :** शालूताई, तुम्हाला आला होता भदेंचा फोन?

**शालू :** करू दे तर मला फोन. नाही त्यांना फोनवरूनच..

**उषा :** अरे, अरे. .. असं झालं काय?

**शालू :** संध्याकाळी किती खुशीत इथून गेलो. पुन्हा गोडीगुलाबी झाली ती साजरी करण्याकरिता काहीतरी गोड करायला सांगितलं. स्वतः खपून मी बेसनच्या वडया बनवल्या. आमचा कुत्रा चघळीत बसलाय त्या. त्या आघातातून बाहेर पडते तर समोर हे वाढून ठेवलेलं. ही चिठ्ठी.

**उषा :** कसली चिठ्ठी?

**शालू :** 'तुमचे रंगढंग बंद करा'.. अशी धमकी देणारी चिठ्ठी लिहीलीय कुणीतरी.

**आई :** हे बघा रात्री उगीच भांडत बसू नका. सकाळी निवांतपणे त्यांना काय विचारायचं ते विचारा. [आत जातात. बाहेरून भदे आणि प्रभाकर यांचा आवाज. दोघं प्रवेश करतात.]

**उषा :** लवकर आलात तुम्ही. मला वाटंल खूप उशीर होईल.

**प्रभाकर :** उशीर झालाच असता पण कॉन्फरन्स रूममध्ये अचानक आग लागली. डिनर बिनर सगळं कॅन्सल झालं.

**भदे :** ही पळापळ. जो तो आपला जीव वाचवतोय. सगळयात पुढे जपानी... इथे पण. [शालूला उचकी लागते.] अरे इथं प्यायलोय मी, आणि उचकी कुणाला लागली? अच्छा तुला? उचकी सुध्दा बेसूर. तू इथंच माझ्यासाठी अजून जागी आहेस?

**शालू :** हो.

**भदे :** वा. .. क्या बात है! काही म्हणा.... प्यायल्यावर तू फार सुंदर दिसतेस. ..

**शालू :** मी प्यायले नाही.

**भदे :** पण मी प्यायलोय ना? माझ्याविषयी म्हणतोय मी. चला आता वर. का रात्री इथंच मुक्काम करणार आहात?

**प्रभाकर :** शालूताई घेऊन चला त्याला. नाहीतर हा माणूस अख्खी सोसायटी जागी करील. गुडनाईट भदे....

**भदे :** गुडनाईट एम. डी.

**प्रभाकर :** उद्या सकाळी देसाईकडे जायचं लक्षात आहे ना?

**भदे :** देसाई?

**प्रभाकर :** आपला क्लासमेट. परवाच बायको वारली ना त्याची? समाचाराला जायला नको?

**भदे :** नको. मला काहीतरीच वाटतं. त्याची ही तिसरी बायको वारली. दोन्ही वेळी समाचाराला गेलो होतो. ही तिसरी खेप. साला आपण त्याच्याकडे तीनतीनदा जायचं आणि त्याला आपल्याकडे एकदाही बोलवायचं नाही. त्याला वाईट नाही का वाटणार?

**प्रभाकर :** पुरे झालं.. शालूताई घेऊन जा यानां.

**उषा :** शालूताई इथंच झोपणार आहेत आज.

**भदे :** ती इथे झोपणार आणि मग वर आपल्या घरी?

**शालू :** मी कशाला हवी? हिला घेऊन जा. [चिट्ठी फडकावते. ]

**प्रभाकर :** ही काय नवीन भानगड भदे?

**शालू :** तुम्हीच वाचा. [प्रभाकरच्या हातात चिट्ठी देते.]

**शालू :** [वाचतो. ..] 'नालायक बदमाशा माणसा, यापुढं माझ्या बायको बरोबर जरी नुसता दिसलास तरी यादं राख तंगडी मोडून ठेवीन.' काय हे भदे?

**भदे :** मलाही समजत नाही.

**शालू :** कोण ही नटरंगी? आणा तिला घरी. आत्ताच्या आत्ता. ते डायव्हर्स पेपर्सही घेऊन या सही करायला तयार आहे मी

**उषा :** शालूताई, शांत व्हा.

**प्रभाकर :** हे बघा भदे, उद्यापासून त्या बाईबरोबर फिरणं बंद..

**भदे :** अरे कुठची बाई? कोणाच्या बायको बरोबर फिरायंच मी बंद करायचं? निदान

खाली सही तरी करायची की नाही माणसानं....?

**शालू :** पहिलंत किती सहन करायचं माणसानं? यापुढे क्षणभर देखील घरात राहायचं नाही मला. आत्ताच्या आत्ता मी घर सोडून जाते. [तावातावाने जाते.]

**भदे :** मला धमकी देते? तुला आपणहून जाता येणार नाही. तसं तुला जाऊ देणार नाही मी. थांब, मीच तुला घराबाहेर काढतो. [पाठोपाठ जातात.]

**उषा :** [प्रभाकरला] अहो, तुम्ही जा जरा वर. समजूत घाला त्यांची. भदेंच काही खरं नाही. दोघांपैकी कुणालातरी एकाला आपल्याकडे घेऊन या. गरज पडली तर तिकडेच झोपा.

**प्रभाकर :** हे भदे म्हणजे... [जातो. आतून सुजाता येते.]

**उषा :** राहुल, तू चक्रावला असशील नाही हे सारं पाहून?

**सुजाता :** हे काही नवीन नाही. नेहमीचंच आहे. थोडीशी घेतली की काकांना चढते. मग कधी कधी इथंच झोपतात दादांबरोबर. आणि मग सकाळी येऊन शालूताई त्यांना घेऊन जातात. [राहुलला] मी कॉफी ठेवत्येय. तू घेणार ? [राहुल काही बोलायच्या आधीच] 'नाही मला नकोय' उत्तर माहित्येय मला.

**उषा :** मला तर त्या दोघांसाठी जागं रहायलाच हवं. राहुल, तुला उशीर होत असला तर राहू दे. नाहीतर थोडा वेळ कंपनी दिलीस तर मला आवडेल.

**राहुल :** काय आहे फार उशीर झाला तर...

**सुजाता :** भाव खाल्ल्याशिवाय कुठच्याच गोष्टीला चटकन 'हो' म्हणत नाही हा माणूस. आणखी थोडा आग्रह केलाना तर थोडा वेळ का रात्रभर इथंच राहील.

**उषा :** थांबायचं असेल तर घर त्याचंच आहे. आणि थांबायचंच नसलं तर जाऊ दे. रखडत चेंबूरपर्यन्त., आपल्याला काय ? [सुजाता जाते. क्षणभर स्तब्धता]

**राहुल :** त्याचं काय आहे उषावहिनी... मला तुम्हाला थोडसं.

**उषा :** पहातेय मी मघापासून, तुझ्या मनात काहीतरी खुटखटतय. काय आहे एवढं ?

**राहुल :** थोडेथोडके नाही तर तीन तास आपण बरोबर होतो. तुम्ही थोडातरी प्रयत्न केलात, माझं मन जाणून घ्यायचा ?

**उषा :** राहूल..

**राहुल :** तुमच्या जवळ बसायची, तुम्हाला हे सारं सांगायची किती धडपड केली मी. पण तुम्ही माझ्या शेजारी बसलाच नाहीत.

**उषा :** छान. अरे, मला जरी नुसती साधी हिंट दिली असतीस की मी तुझ्या शेजारी बसल्यामुळे तुझा आनंद गगनात मावेनासा होणार आहे तर मी आपणहून तुझा हात पकडून तुला माझ्या शेजारी बसवला असता.

**राहुल :**तुम्हाला सारं माहीत असताना पुन्हा पुन्हा तुम्हाला हिंट का दयायची ?

**उषा :**हे बघ राहुल, जरा समजेल असं बोल.

**राहुल :**सारा धीर एकवटून कुणीतरी काहीतरी सांगायची धडपड करतंय आणि केवळ दोन हात दूर बसलेलं माणूस ते न समजल्याचं नाटक करतंय याला काय म्हणतात ?

**उषा :**राहुल, मला माहित्येय, तुला हेच सांगायचंय ना, की, ''उषा वहिनी, मी कुणाच्या तरी प्रेमात पडलोय आणि तुमची एकदा पसंती मिळाली की मग मी लग्न करीन. एवढंच ना ? अरे, मग सांगून टाक. एवढीशी गोष्ट आणि त्याचं अवडंबर किती ?

**राहुल :**तसं नाहीये उषावहिनी, ट्राय टू अंडरस्टँड. तुमच्याशिवाय दुसऱ्या कुणालाही सांगण्यासारखी ही गोष्ट नाही. कारण ही गोष्ट आपल्याविषयी आहे. आपल्या रिलेशन्सविषयी.

**उषा :**आपली रिलेशन्स ?

**राहुल :**हो, आपली रिलेशन्स. जी तुमच्या माझ्याशिवाय दुसऱ्या कुणालाच माहीत नाहीत. आपल्याला एकमेकांविषयी काय वाटतं ते सांगायला शब्दांची गरज नाही. माणसाची नजर खूप काही सागून जाते. [उषा न बोलता निघून जाऊ लागते. राहुल तिचा हात पकडतो.]

**उषा :**हे काय राहुल, हात सोड माझा. मला जाऊ दे. ..

**राहुल :**आधी इथं शांतपणानं बसून मला जे काही सांगायचंय ते नीट ऐकून घ्या

**उषा :**राहुल,

**राहुल :**प्लीज, फक्त पाचच मिनिटं. माझ्यासाठी. [उषा बसते.] गेली चार वर्ष मी इथ येतोय. तुमच्या मुलीला शिकवायला. या चार वर्षात या घरानं मला खूप काही दिलंय. इथं मला निरपेक्ष प्रेम मिळालं आणि मी जवळजवळ विसरून गेलो की मी अनाथ आहे. मला या जगात कुणीही नाही.

**उषा :**तर मग या घरानं तुझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाईल असं अक्षरही तोंडातून काढू नकोस.

**राहुल :**धैर्य नसल्यामुळे म्हणा किंवा कदाचित् लाज वाटल्यामुळे असेल, तुम्ही गप्प राहिलात. पण यापुढे मला नाही गप्प राहता यायचं. उषावहिनी, तुम्ही मला आवडता. मनापासून मी तुमच्यावर मी प्रेम करत आलो. आणि आता तर मला तुमच्याशिवाय जगणं केवळ अशक्य आहे. मी आज ठरवलं होतं की हे सारं तुम्हाला सांगायचं....

**उषा :**तुझं डोकं ठिकाणावर आहे का ? या घरातल्या कुणी तुझं बोलणं ऐकलं तर तुझं काय होईल ? मला काय काय ऐकून घ्यावं लागेल याचा विचार केलास तू ?

**राहुल :** घरच्यांना आजपर्यन्त काही कळू दिलंय आपण ? कुणालाच माहीत नाही की आपलं एकमेकांवर प्रेम आहे.

**उषा :** तोंड सांभाळून बोल. माझं तुझ्यावर प्रेम आहे असं तुला वाटावं अशी कुठलीच गोष्ट मी केलेली नाही.

**राहुल :** म्हणजे ? तुमचं माझ्यावर प्रेम नाही ? ही कसली भलती चेष्टा करताय ? हां. म्हणजे तसं स्पष्ट आपण एकमेकांना सांगितलं नसेल, मान्य आहे. पण....

**उषा :** पण काय ? तुला दाखवलेल्या चांगुलपणाला प्रेम समजलास तू? तुझी केलेली थट्टामस्करी, हास्य विनोद याला प्रेम समजलास तू? आपल्या नवऱ्यावर, मुलांवर, या घरावर प्रेम करणारी एक विवाहित स्त्री काही कारण नसताना तुझ्या प्रेमात पडेल असं तुला वाटलं तरी कसं? तू समजतोस कोण मला?

**राहुल :** परिणामांना घाबरून तुम्हाला अर्ध्या वाटेवरूनच परत फिरायचं असेल तर माझी हरकत नाही. पण त्यासाठी मला असं हिणवायचं कारण नाही.

**उषा :** तुला पुन्हा एकदा सांगते, माझ्या मनात कधीच तसं काही नव्हतं आणि म्हणून अर्ध्या वाटेवरून परत फिरायचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**राहुल :** तर मग तुम्हाला समजण्यात माझी चूक झाली उषावहिनी. खरचं चूक झाली.

**उषा :** फार मोठी चूक झाली. माफ करता न येण्यासारखी. यापुढं तुझ्याशी मला पूर्वीसारखं वागता येईल? तू बोललास ते विसरता येईल माला? खरचं दुर्दैवाची गोष्ट आहे ही की अशा तऱ्हेचे विचार तुझ्या मनात यावेत आणि तेही एका मातेसमान... अरे वहिनी म्हणतोस ना मला? मग वहिनी हे आईचंच रूप असतं.

**राहुल :** प्लीज. ही असली खोटी नाती मला आवडत नाहीत. प्रेयसीला आईचं नातं चिकटवण्याचा तुमचा प्रयत्न म्हणजे निव्वळ भेकडपणा आहे. तुम्हाला जर कीवच करायची असेल तर तुम्ही तुमची स्वतःची करा. तुमच्या भेकडपणाची करा. माझ्या दुर्दैवाची नको.

**उषा :** तुला माझ्या मुलीची शपथ घेऊन सांगते, तुझ्याकडे त्या नजरेनं मी कधी पाहिलंच नाही.

**राहुल :** आणि मी तुमच्याकडे दुसऱ्या कोणत्याही नजरेनं पाहू शकत नाही

**उषा :** तर मग त्या तुझ्या नजरेला दुसरीकडे पहायला शिकव आणि झालं गेलं सारं पुसून टाक. कायमचं .

**राहुल :** ते शक्य नाही आता तर ते मुळीच शक्य नाही. माझ मन वेडंपिसं झालंय. खरंच माझे प्रेम आहे तुमच्यावर. .

**उषा :** शीः किती मूर्ख आहेस तू. आपल्या बरोबरीनं कुणीतरी धावतंय या कल्पनेनं मैलोनमैल धावत सुटावं आणि अर्ध्या वाटेवर मागं वळून पहावं तर कुणीही नाही

मग...

**राहुल:**मग काय?

**उषा :**शहाणा माणूस दिशा तरी बदलतो किंवा धावायचं तरी थांबवतो.

**राहुल :**म्हणजे?

**उषा :**म्हणजे उदयापासून या घरात पाउल टाकायचं नाही. तरच याचा शेवट होऊ शकेल.

**राहुल :**उषा वहिनी.

**उषा :**उदयापासून तुझ्या शिकवणीची गरज नाही.

**राहुल :**माझा असा अपमान करून तुम्हाला काय मिळणार आहे?

**उषा :**अपमान तू केला आहेस माझा. मी तुझा अपमान करत नाहीये. मी तुला तुझं स्थान, तुझी जागा, तुझी लायकी दाखवून दिलीय. म्हणजे निदान भविष्यात तुझा एखादया सुसंस्कारित घराशी संबंध आलाच तर सज्जनपणानं वागायची तुला बुध्दी होईल. [सुजाता कॉफी घेऊन येते.]

**सुजाता :**वहिनी, कॉफी...

**उषा :**मला कॉफी नकोय . [आत वेगानं निघून जाते.]

**सुजाता :**एकदम काय झालं वहिनीला? कमाल आहे. [क्षणभर स्तब्धता]

**राहुल :**मी निघतो. मला निघायला हवं.

**सुजाता :**नाराज आहेस माझ्यावर? का आणखी कुणावर?

**राहुल :**नाही.

**सुजाता :**काही बोलाचाली झाली वाटतं?

**राहुल :**लेटस नॉट टॉक अबाऊट इट.

**सुजाता :**माझ्याशी बोलायला तुला आवडत नाही?

**राहुल :**तसं काही नाही.

**सुजाता :**मग संध्याकाळपासून प्रत्येक गोष्टीला ''नाही'' का म्हणतोयस? मला टाळतोयस का? नाटकाला येणार का? ''नाही'' रात्री इथंच राहणार का? ''नाही'' कॉफी घेणार का? ''नाही'' मी विचारलं की प्रत्येक गोष्टीला ''नाही'' तुला हवं - नको ते पहायला मला आवडतं, हा काय अपराध आहे माझा?

**राहुल :**त्या गोष्टीची चर्चा करायची ही वेळ नाही.

**सुजाता :**मान्य आहे. पण मला समजून घ्यायचंय, माझ्याशी इतका तुटक का वागतोस

तू?

**राहुल :**सांगेन केव्हांतरी.

**सुजाता :**कधीतरी नाही, उदयाच....

**राहुल :**उदयाच?

**सुजाता :**हो उदयाच. मला तुझ्या या वागण्याचा त्रास होतोय. उदया दुपारी साडेतीन वाजता मी तुझी एशियाटिकजवळ वाट पाहीन.

**राहुल :**अगं पण....

**सुजाता :**फक्त एकदाच मला तुला भेटायचंय. फक्त एकदाच. त्यानंतर नाही म्हणालास तर पुन्हा कधीच भेटणार नाही.

**राहुल :**मला खरंच शक्य नाही.

**सुजाता :**नेहमीसारखं यावेळी ''नाही'' नको म्हणूस. उदया दुपारी साडेतीन वाजता मी तुझी वाट पाहते. आला नाहीस तर माझं दुर्दैव म्हणून मी गप्प बसेन पण मला खात्री आहे. यावेळी तू येशील. गुड नाईट. [आत जाते.]

**राहुल :**होय यावेळी मी येईन. नक्की येईन. मला पण जाणून घ्यायचंय माझ्याशी असं तुटक वागणं का? पुन्हापुन्हा मला नाही का म्हटलं जातंय? का ठोकरलं जातंय मला? एकदा फक्त एकदाच मला भेटायचंय तुला. मागाहून ''नाही'' म्हटलंस तर पुन्हा कधीच भेटणार नाही. उदया साडेतीन वाजता तुमची मी वाट पाहीन. उषावहिनी, तुम्ही याल. मी म्हणेन तिथं तुम्हाला यावंच लागेल. उदया साडेतीन वाजता रणरणत्या दुपारी एकांतात चांदणं फुलवू आपण. उदया दुपारपासून संध्याकाळपर्यन्त तुम्ही माझ्या खास पाहुण्या असाल आणि मी तुमचा यजमान....

**[अंधार : दृश्य समाप्त]**

# [अंक पहिला : दृष्य ३]

[एका आधुनिक हॉटेलामधील सुसज्ज रूम. राहुल फोनवर बोलत आहे.]

**राहुल :** मी या रूममध्ये पाऊल टाकलं आणि माझ्या लक्षात आलं की सुजातानं मला फसवून इथं आणलंय. या हॉटेलात ही रूम तिनं अगोदरच फोनवर बुक करून ठेवली होती. ''दादा या हॉटेलात पार्टी देणाराय'' असं मला सांगितलं. हो, आणि म्हणाली, ''माझ्या मदतीला या'', मला काय माहीत? मी आलो आणि आता मला ब्लॅकमेल करतेय. मला धमकी देत्येय, की तिच्याशी लग्न करायला मी जर कबूल झालो नाही तर खिडकीतून उडी टाकून जीव देईल.... नाही नाही. इथेच आहे, माझ्या समोरच. [माऊथ पीसवर हात ठेवून] सुजाता, अगं उषावहिनी आहेत. फोनवर बोल त्यांच्याशी. [थोड्यावेळानं] कम ऑन सुजाता, उषावहिनींशी पण नाही बोलणार? हे बघ, सुजाता, पोरकटणा आता पुरे झाला. [फोनवर] उषावहिनी, तिनं बाथरूममध्ये कोंडून घेतलंय स्वतःला. तुम्ही तिला.... प्लीज जरा वर येता का? कृपा करून तिची समजूत घाला आणि तिला घरी घेऊन जा हो. रूम नंबर १०७, दॅटस राईट. [फोन ठेवतो. चेहऱ्यावर एक विजयी हास्य. बाथरूमचा दरवाजा बंद करतो. पुन्हा रिसिव्हर उचलतो. ] हॅलो, ऑपरेटर, व्हेअर इज शी? व्हेरी गुड. नाऊ रिमेंबर वन थिंग. आय डोंट वॉंट एनी वन टू डिस्टर्ब मी. नो टेलिफोन कॉल्स.... नो रूम सर्व्हीस. .. ओ. के.? फाईन. [फोन ठेवतो. दरवाज्याकडे जाऊन बाहेर एक नजर टाकतो. रूमचा दरवाजा उघडाच ठेवून बाथरूमच्या दाराशी येतो] हे बघ सुजाता, हे काय लहान मुलासारखं? हे तुला शोभत नाही. कृपा करून बाहेर ये. **उषा** वहिनी इथं आल्यायत. त्यांना तुझ्याशी बोलायचंय. [शेवटच्या वाक्याला दारात उषा उभी आहे.] या उषावहिनी, गेला तासभर प्रयत्न करून मी थकलो. ती काही ऐकायलाच तयार नाही. आता तुम्हीच बघा. ऐकलं तर तुमचंच ऐकेल.

**उषा :** मला फोन केलास ते बरं केलंस. नाहीतर पंचाईत झाली असती. त्यात आज घरी पार्टी आहे. आपल्याशिवाय कुणालाही ही गोष्ट कळता कामा नये.

**राहुल :** म्हणजे मला आणखी एक वचन द्यायला हवं. तुमच्या घराण्याची इज्जत सांभाळण्याकरिता जे काही घडलं त्याची मी कुठही वाच्यता करणार नाही. बस? आता एकदा तुमच्या लाडक्या सुजाताला इथून बाहेर काढा आणि घरी घेऊन जा, की मी सुटलो.

**उषा :** [बाथरूमपाशी जाते ] सुजाता आधी बाहेर ये पाहू. शोभतं का तुला हे असं

वागणं? आधी बाहेर ये. आणि आपण शांतपणानं बोलू. काहीतरी मार्ग निश्चित निघेल. घाबरायचं किंवा लाज वाटायचं काही कारण नाही.

**राहुल :** हं मी पण तेच म्हणतोय उषा वहिनी. तुम्हाला लाजायचं किंवा घाबरायचं काहीच कारण नाही. तुम्ही इथं आहात हे माझ्याशिवाय कुणालाच माहीत नाही. तुम्हाला काळजी करायचं काही कारण नाही. आणि लाज सुध्दा वाटायचं कारण नाही.

**उषा :** म्हणजे? सुजाता कुठाय? [बाथरूमचा दरवाजा उघडते.] कुठाय सुजाता?

**राहुल :** कुठंच नाही. निदान पंधरावीस मैलांच्या परिसरात तर निश्चित नाही.

**उषा :** ही काय चेष्टा चालविली आहेस तू?

**राहुल :** कुणी केली चेष्टा? मी? मी नाही उषावहिनी. चेष्टा तुम्ही केलीत माझी. काही तासांपूर्वी तुमच्या घराच्या दिवाणखान्यात मला मधोमध उभा करून माझ्या स्वप्नांची माझ्या आकांक्षांची चेष्टा केलीत तुम्ही. टर उडवलीत.

**उषा :** ती चेष्टा नव्हती.

**राहुल :** मग काय होतं? तुमचा दुबळेपणा? का तुमचा भेकडपणा? का माझा अपमान होता?

**उषा :** राहुल काल तू एक चूक केलीस आणि आज मला इथं असं फसवून आणून तू दुसरी भयंकर चूक करून बसलायस.

**राहुल :** नाही उषावहिनी. आज चूक नाही करणार मी. गणिताचा शिक्षक आहे मी. आजची माझी कॅल्क्युलेशनस् चुकणार नाहीत.

**उषा :** कसली कॅल्क्युलेशनस्? तुझी हलकट इच्छा पूर्ण करायची?

**राहुल :** करेक्ट! एव्हरीथिंग इज फेअर इन लव्ह ॲण्ड वॉर. इजन्ट इट?

**उषा :** अशी निर्लज्ज मागणी माझ्याकडे करण्याचं धाडस आजपर्यन्त कुणी कधी केलं नाही ते तू केलंस. पण हे पहिलं आणि शेवटचं. पुन्हा जर असं काही करायचं मनात आलं तर एक गोष्ट लक्षात ठेव माझ्या घराण्याच्या इभ्रतीसाठी मी जीव देऊ शकते आणि जीव घेऊ शकते. मला जाऊ दे राहुल.

**राहुल :** ह्या रूमचं भाडं किती आहे माहीती आहे? तासाला दीडशे रूपये. ते वसूल केल्याशिवाय.

**उषा :** वासनाच भागवायची असेल तर या शहरात धंदेवाईक बायका काही कमी नाहीत.

**राहुल :** पण मला तुम्ही हव्या आहात, फक्त तुम्ही. तुमच्या आकर्षणाच्या भोवऱ्यात माझ्या मनाच्या चिंध्याचिंध्या झाल्यात. तुमच्याशिवाय मला काही काही सुचत नाही. मला फक्त एकच ध्यास आहे. तुमचा. माझ्यासारखा सामान्य माणसाला तुमची प्राप्ती सहजासहजी कशी होणार?

**उषा :** आणि म्हणून तू हे सारं कारस्थान केलंस? एखादया हलकट मवाल्यासारखं?

अरे माझ्या मुलीचं भविष्य तुझ्या हातात सोपविण्याइतका मी विश्वास टाकला तुझ्यावर आणि तू इतका हलकट, इतका नीच निघालास? तू इतका नालायक आहेस हे जर मला आधी माहीत असतं तर मी.

**राहुल :**एकदाच उषा वहिनी फक्त एकदाच. पुन्हा कधीही मी तुम्हाला माझं तोंड दाखवणार नाही. निघून जाईन. ही नोकरी हे शहरसुध्दा सोडून जाईन. .. एकदाच. एकदाच मला तुमच्या तोंडून ऐकायचंय. ''तू मला खूप आवडतोस, मी तुझीच आहे.

**उषा :**ते शक्य नाही.

**राहुल :**एकदाच. फक्त एकदाच....

**उषा :**आपलं स्वत्व विसरून एका स्त्रीच्या पायावर लोटांगण घालणाऱ्या लाचार माणसाला पुरुष नाही म्हणत... रस्त्यावरची कुत्रीसुध्दा इतकी लाचार नसतात.

**राहुल :**शट अप. मला हवं ते मी जबरदस्तीनं घ्यावं अशी तुमची इच्छा आहे.?

**उषा :**अंगाला हात तर लावून पाहा माझ्या. आरडा ओरडा करून सर्व हॉटेल गोळा करीन.

**राहुल :**अस्सं? ठीक आहे. करा आरडाओरडा सगळं हॉटेल गोळा करा. फक्त हॉटेलच कशाला? ह्या खिडकीत उभं राहून बोंब मारली तर रस्त्यावरची माणसंसुध्दा वर येतील. पण पुढे काय? सगळयांना गोळा करून करणार काय? सांगणार काय?

**उषा :**त्यांना ओरडून सांगेन 'हा माणूस माझ्यावर बळजबरी करतोय. त्याच्या इच्छेला नकार दिल्यामुळे माझ्यावर बलात्कार करू पहातोय.'

**राहुल :**सुंदर? फारच छान? सीन छान होईल. पण डायलॉग मध्ये थोडासा बदल करून मी एक ट्विस्ट देऊ का? कसं वाटतंय. . मी सांगेन 'ह्या बाईनं नवऱ्याच्या नावानं निरोप देऊन मला इथ फसवून आणलं तिच्या इच्छेला मी नकार दिला म्हणून बोंबाबोंब करून मला बदनाम करून आयुष्यातून उठवायचा प्रयत्न करतेय. असं मी लोकांना कळवळून सांगितलं तर काय वाटेल लोकांना? आईना किती शॉक लागेल. मिस्टर देशमुखांची काय स्थिती होईल? [हसतो.] आरडाओरडा करायचे कष्ट घ्यायच्या आधी या साऱ्या गोष्टींचा थोडा विचार करावा असं नाही तुम्हाला वाटत?

**उषा :**तुला काय वाटतं? यावर विश्वास बसेल सर्वांचा?

**राहुल :**बाकिच्यांचं मला माहीत नाही. पण मि. देशमुखांचा निश्चित विश्वास बसेल...

**उषा :**म्हणजे?

**राहुल :** मिसेस उषा देशमुख, ही रूम तुमच्या नावावर बुक केली आहे.

**राहुल :** [उषाचा हात धरून तिला पलंगावर ढकलतो.] आज या क्षणी तुमचं स्थान इथं आहे. देशमुख घराण्याची इज्जत, प्रतिष्ठा, अब्रू या साऱ्या साऱ्यांची काही क्षणातच राख होणार आहे. या इथं आणि या क्षणापासून विसाव्या मिनिटाला मी स्वतः मिस्टर प्रभाकर देशमुखांना कळविणार आहे. तुमच्या पत्नीला, या व्यभिचारी स्त्रीला या क्षणी इथून घेऊन जा. [ उषाला पकडायचा प्रयत्न करतो. ती दरवाज्याकडे धावते. दरवाजा उघडते. दरवाजात एक आगंतूक इसम उभा. तो उषाला आत ढकलतो. आत येतो आणि दार लावून घेतो.]

**उषा :** कोण तू ? [राहुलला] कोण आहे हा?

**राहुल :** मला माहीत नाही.

**उषा :** खरं सांग कोण आहे हा? याला काय हवंय?

**राहुल :** खरंच मी याला ओळखत नाही. [आगुंतकला] कोण तू ? [आगंतुक सिगारेट पेटवितो. ] लेट मी टॉक टुद ऑपरेटर....

**आगंतुक :** ऑपरेटरच्या बाजूला माझी दोन माणसं उभी आहेत. आणि जरूर पडली तर ती दोघही वर येतील.

**राहुल :** धमकी देतोयस? कोण आहेस तू ?

**आगंतुक :** मी कोण? माझा परिचय करून घ्यायची आवश्यकता नाही... पण एक गोष्ट नक्की. तोंडातून एक चकार शब्द न काढता मी सांगेन ते केलंत तरच तुमची हाडं शिल्लक राहतील.... नाहीतर तुम्हाला दोघांना स्ट्रेचरवरून न्यावं लागेल.

**उषा :** पण मला माझ्या घरी..

**आगंतुक :** चूप हरामजादी. . तोंडातून एक शब्द बाहेर काढलास तरी एकाच गोळीनं मेंदूचा लगदा बाहेर काढीन. फक्त एकाच गोळीनं. ..

**उषा :** पण तुला हवंय काय?

**आगंतुक :** मला जे हवंय ते मी स्वतः घेईन. चला दोघांनी पाठ करून उभे राहा.

**राहुल :** तुला जे काही हवंय ते दयायला आम्ही तयार आहोत. तुला पैसेच हवेत ना?

**आगंतुक :** मला जे हवंय ते मी स्वतः घेईन. मगाशीच सांगितलं ना? माझी काळजी तुम्ही नका घेऊ.... चला पाठ करून उभे राहा... [राहुलला धक्का मारून भिंतीकडे ढकलतो.] मी जसे सांगेन तसं करायचं. प्रश्न विचारायचे नाहीत. पाकीट कुठाय? [राहुलचं पाकीट घेतो. पैसे काढतो आणि पाकीट फेकून देतो.] किती दिवस चालू आहे तुमचं लफडं ? या हॉटेलात कधी पाहिलं नाही चल अे बाई.. पर्स कुठाय तुझी ? [ उषा पर्स फेकते.] नाव काय तुझं?

साली श्रीमंत घराण्यातली वाटते. काय कान फुटले का? नाव काय तुझं

**राहुल :** आमच्या नावाशी तुला काय करायचंय? उचल ते पैसे आणि चालता हो.

**आगंतुक :** ए ऽ आवाज खाली. दुसऱ्यांच्या बायकांबरोबर लफडी करायची म्हणजे आवाज हळू आणि डोकं थंड ठेवायचं. समजलं का भडव्या? आवाज नाही करायचा. एक थप्पड मारली तर रक्त ओकशील.

**उषा :** तुला जे पाहिजे ते घे आणि मला माझ्या घरी जाऊ दे.

**आगंतुक :** घड्याळं काढा तुमची. [दोघं घड्याळं काढून देतात.]

**उषा :** पर्समध्ये वरच्या खणात हजार रूपये आहेत ते हवं तर घे. पण मला माझ्या घरी जाऊ दे.

**आगंतुक :** [पर्समधून पैसे काढून घेतो.] अंगठ्या, चेन अंगावर जे काही असेल ते काढून द्या. [उषाला] ए बाई अंगठी काढ का बोटच कापून घेऊ?

**उषा :** प्लीच ही राहू दे. ही माझी लग्नाची अंगठी आहे.

**आगंतुक :** साली गळा काढून रडतेय त्या अंगठीकरता. बाजारबसवी. शरम नाही वाटत? आपल्या यारा बरोबर हॉटेलात मजा मारायला यायचं आणि वरती लग्नातल्या अंगठीसाठी गळा काढायचा.

**उषा :** तसं नाहीये. हा माणूस...

**आगंतुक :** काय करतो तुझा नवरा? ऑफीसर आहे? का बिझनेस-मन आहे? राहता कुठं तुम्ही? जाऊ दे च्यायला.... आपल्याला काय करायचंय. हे बघ बाई, तुझ्या अंगाला हात लावणार नाही मी एकदम सेफ राहशील तू. बदल्यात यापुढं मी सांगेन तसं आणि सांगेन तितिकं करायचं तुम्ही दोघांनीही.

**आगंतुक :** नाही म्हटलंत तर या तुझ्या याराचे हातपाय बांधून त्याच्या देखत मी आणि माझे दोन साथीदार तुझ्यावर....

**उषा :** माझं जरा ऐकून घ्याल का? मी तशातली नाही आहे हो. या माणसानं फसवून मला इथं आणलंय.

**आगंतुक :** हे पाहा बाई, आपल्याला तुझी स्टोरी ऐकायला टाईम नाही. आता एकदा आठ दहा फोटो काढले....

**उषा :** फोटो? कसले फोटो? कुणाचे फोटो?

**आगंतुक :** च्यायला पुन्हा प्रश्न? बाई प्रश्न विचारायचे नाहीत. ए हिरो, घे त्या बाईला जवळ, हात टाक गळ्यात आणि राहा उभे तिथे.... [फोटो काढायला सुरूवात करतो.]

**राहुल :** पण हे फोटो घेऊन काय करणार आहेस तू?

**आगंतुक :** घरी फ्रेम करून लावणार आहे. प्रश्न विचारतोय हरामी. बकवास बंद कर आणि मी सांगतो तसं कर. खेच तिला आणि टाक हात कमरेभोवती. दॅटस गुड. अब प्यारी को गले लगाओ. हो. अभी बेडवर. आता मिठीत घे.

**उषा :** मला घरी जाऊ दे प्लीज...

**आगंतुक :** आता फक्त पाच मिनिटं.

**राहुल :** आणखी किती फोटो काढणार आहेस?

**आगंतुक :** दोनचार शेवटचे... बाथरूममध्ये शॉवरखाली.

**उषा :** नाही नाही प्लीज.

**आगंतुक :** चूप.

**राहुल :** होतं नव्हतं ते सारं तुला दिलं. तुला आणखी किती पैसे हवेत? किती? पाच हजार? दहा हजार? पंचवीस?

**आगंतुक :** पाच पंचवीसनी काय होतंय? आपली भूक मोठी आहे. आज अकाउंट खोललाय. लागतील तेव्हां लागतील तसे पैसे काढू. घाई काय आहे?

**राहुल :** म्हणजे तू ब्लॅकमेल करणार? मी नाही तुला ते करू देणांर. [त्याच्यावर झडप घालतो. कॅमेरा हिसकावून घेतो. उषाकडे फेकतो.]

**राहुल :** उषावहिनी पकडा. पळा इथून. [राहुल आणि आगंतुक यांची झटापट. उषा दाराकडे पळते. दार उघडते. दारात दोन सशस्त्र गुंड उभे. ते तिला पकडतात आणि आत ढकलतात.] प्लीज सोडून दया तिला.

**आगंतुक :** बरीच मस्ती आलेली दिसतेय तुला. थांब तुझी मस्ती उतरवतो. घेऊन चला रे याला. [आगंतुक आणि गुंड राहुलला घेऊन बाहेर पडतात. उषा एकटी.]

**उषा :** [ उषा फोनचा रिसिव्हर उचलते.] हॅलो ऑपरेटर.. प्लीज गेट मी नंबर ८२२६४३९ प्लीज . . हॅलो हॅलो सुजाता मी उषावहिनी. . मी काय सांगते ते नीट लक्ष देऊन ऐक. मी एका फार मोठ्या संकटात सापडलेय. तू कसंही करून माझा कोणताही कपडयांचा सेट घेऊन ये. हॉटेल ग्रीन पार्क. रूम नं. १०७. घरात कुणालाही कळू देऊ नको. एका गुंडानं रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून मला इथं पळवून आणलं. माझे पैसे दागिने लुटून तो पसार झाला. त्याच्याशी झालेल्या झटापटीत माझे कपडे फाटले. आणखी काही नाही फोनवर सांगू शकत. तू येतेस ना.? हॅलो... हॅलो.. . कोण आई? तुम्ही? [ हातातला रिसिवर गळून पडतो. अंधार. ]

**[अंक पहिला समाप्त]**

२३०८९ २८।५।९०

# अंक दुसरा [दृश्य – १]

[ घराचा दिवाणखाना. पाहुण्यांच्या आगमनाची पूर्व तयारी चालू आहे. नोकरांची धावपळ. सुजाता फोनवर बोलत आहे ]

**सुजाता :**हॅलो... हॅलो राहुल, राहुल देसाई आहेत का तिकडे? हॅलो. कृपाकरून दोन्ही कानांनी ऐकू येतं अशा कुणाला तरी जरा टेलिफोन दया हो हो मला माहित्येय शाळा बंद आहे मला फक्त एवढंच हवंय राहुल तिकडे आहे की नाही? शी [ फोन ठेवते ] मूर्ख. [बेडरूममधून प्रभाकर बाहेर येतो.]

**प्रभाकर :**कमाल आहे या दोघींची. काही घरची फिकीरच नाही. गाडी घेऊन गेल्या, तर निदान आपण कुठे जातोय हे सांगून तरी जायचं.

**सुजाता :**सगळ्यात मला आश्चर्य वाटतं आईचं.

**प्रभाकर :**त्या गेल्या तेव्हां तू घरात नव्हतीस?

**सुजाता :**मी? मी तर सकाळीच कॉलेजला गेले होते. तू यायच्या आधी दहा-पंधरा मिनिटं मी घरी आले.

**प्रभाकर :**ठीक आहे पाहू या वाट. मी जरा आत जाऊन कपडे बदलून येतो. [आत जायला निघतो. अितक्यात फोनची बेल वाजते. सुजाता रिसिव्हर उचलते.]

**सुजाता :**[ फोनवर ] हॅलो.... अरे काय पत्ता काय तुझा? होतास कुठं? नाही उषावहिनी नाहीत घरात. कां? माझ्याशी नाही बोलता यायचं? तासभर तुझी मी वाट पाहात होते.... तू का नाही आलास? बस सॉरी म्हटलं की झालं. नुसतं सॉरी सॉरी म्हणण्याइतकी साधी गोष्ट वाटली तुला? तुला मी काय सांगितलं नव्हतं मला तुला भेटायचं आहे म्हणून? एक सांगू मला त्रास देताना तुला आनंद होतो.... अगदी राक्षसी आनंद होतो. 'नाही' काय? तसंच मला माहीती आहे. आणि ऐक तुला यात आनंद होतोय ना? ठीक आहे. माझी काही हरकत नाही. मी तोंडातून चकार शब्द काढणार नाही. मग सारं आयुष्यभर का त्रास होईना.... सॉरी, माझी बिलकूल बोलायची इच्छा नाही. [फोन ठेवते प्रभाकरनं हे सारं बोलणं ऐकलंय. सुजाता पाण्याने भरलेले डोळे पुसते आणि वळते. तिच्या दृष्टीस प्रभाकर पडतो. ] दादा . .

**प्रभाकर :**कुणाच फोन होता? राहूलचा? [ती मानेनं हो म्हणते.] किती दिवस झाले तो तुला असा त्रास देतोय?

**सुजाता :**तसं नाही दादा.

**प्रभाकर :**इतके दिवस तू मला का नाही सांगितलंस? मला जर माहीत असतं तर त्या

हरामखोराला मी केव्हांच सरळ केलं असतं.

**सुजाता :** दादा, तुझा काहीतरी गैरसमज होतोय. .

**प्रभाकर :** उदयाच्या उदया त्याचा जो काही हिशोब असेल तो चुकता करून टाका आणि सांगा. .. त्याच्यासारख्या बेजबाबदार माणसाला या घरात स्थान नाही.

**सुजाता :** दादा माझं पुरतं ऐकून तर घे.

**प्रभाकर :** या खानदानी घरात जर त्याला प्रवेश हवा असेल तर त्याला आधी खानदानी घराण्याचा जावई कसा वागतो हे शिकवायला हवं. ..

**सुजाता :** [ आश्चर्याने ] म्हणजे दादा?

**प्रभाकर :** आणि आपली भावी पत्नी सुजाता हिला काडीचाही त्रास देणार नाही असं वचन दयायला हवं.

**सुजाता :** दादा तू किती चांगला आहेस.

**प्रभाकर :** अगं त्यात काय? राहुल खरंच चांगला मुलगा आहे. इमानदार, विश्वासू, निष्ठेनं काम करणार, विचारी, आणखी काय पाहिजे? आईला त्याचा स्वभाव आवडतो. आणि उषा तर काय. मला खात्री आहे राहुलचं नुसत नाव ऐकल्यावर ती हो म्हणेल. [श्री. व सौ भद्रे प्रवेश करतात.]

**प्रभाकर :** या या भद्रे. अरे काय मी पाहतोय काय? तुम्ही दोघं आणि हातात हात घालून? अरे कुणी पाहिलं तर त्यांना खरं नाही वाटायचं की काल रात्री तुम्ही कडाक्यानं भांडला होतात.

**भद्रे :** कालचं काल संपून गेलं. आता यापुढं ठरवलंय नो मोअर क्वॉरल्स. नो मोअर फाईटस. नो मोअर डिव्होर्स.

**शालू :** सेलिब्रेट करण्याकरिता मी साजुक तुपातला बदामाचा शिरा केला होता. खास यांच्याकरता.

**भद्रे :** पहिला घास घशाखाली उतरेना. म्हटलं काय होणार आहे आपलं कोण जाणे. पण देवाचं नाव घेतलं आणि लोटला घास घशाखाली. काही झालं नाही.

**शालू :** दुपारी दोन तास ताणून दिली होती.

**भद्रे :** गेल्या कित्येक दिवसात इतकी छान झोप लागली नव्हती.

**शालू :** तुम्हाला खरं नाही वाटणार. पण झोपेत हे इतके बदलून जातात. अगदी वेगळे. जागेपणी नाही, पण झोपेत माझ्याशी इतकं प्रेमाने बोलतात की ते ऐकून मला तर बाई आश्चर्यानं थक्क व्हायला होतं.

**प्रभाकर :** काय, भद्रे, ऐकतोय काय मी हे?

**भद्रे :** काय आहे. झोपेत होतात माणसाच्या हातून चुका.

**शालू :**त्यांचं माझ्यावर किती प्रेम आहे हे आज मला समजलं. झोपेतलं तुमचं बोलणं ऐकून मला अगदी गदगदून आलं होत. एक गोष्ट माझ्या अजुनही लक्षात येत नाही. माझ्याशी प्रेमानं बोलता बोलता.

**भदे :**झोपेत.

**शालू :**हो हो झोपेत. तुम्हाला माझं नाव कसं विसरायला होतं हो? कधी ज्युली काय म्हणता. कधी डॉली तर कधी कामिनी.

**भदे :**हो? तर त्यात काय एवढं मोठंसं? जागेपणी नाही मी तुला किती वेगवेगळ्या नावानं हाका मारतो. कधी शालू तर कधी अंबा, तर कधी चंडिका. तेव्हा नाही ते तुला आश्चर्य वाटत? आणि काय होतं. झोपेत जड जड नावं बोलायला कठीण जातात. ज्युली, डॉली ही कशी सोपी नावं आहेत.

**शालू :**हे हे मात्र खरं हं.

**भदे :**चला एक लफडं मिटलं. पाहिलंत? आमच्यातली भांडण तंटे सगळं सगळं इतिहासजमा झालं. माझ्या शालूशिवाय जगातल्या दुसऱ्या कोण्त्याही सुंदरीकडे नजर वर करूनसुध्दा पाहणार नाही मी.

**प्रभाकर :**काय सांगताय काय भदे? तुम्हाला जमेल हे?

**भदे :**त्यात काय कठीण आहे? समजा एखादी सुंदर स्त्री समोर आलीच तर मी स्वतःलाच विचारीन ''अरे बेट्या, या सुंदरीचे हे रेशमी केस, डाळिंबी ओठ, हरणासारखे डोळे, कमनीय बांधा हे सगळं जर वजा केलं तर काय उरेल? जे उरेल ते आणि मिसेस भदे यांच्यात काही फरक आहे का? मग कशाला तिच्या नादी लागतोस? [मुख्य दरवाजातून आई प्रवेश करते.]

**प्रभाकर :**अगं आई होतीस कुठं तू इतका वेळ? इथं आमच्या जिवाला किती घोर लागून राहिला होता. तुम्हा दोघींचा पत्ता नाही. गेला होतात कुठं तुम्ही दोघी जणी? तुझ्या बरोबर नव्हती ती? [उषा प्रवेश करते.] कुणाला सांगून तरी जायचं. निदान बाहेरून फोन तरी करायचा म्हणजे निदान आम्ही काळजी तरी करीत बसलो नसतो. कुठं गेला होतात तुम्ही?

**आई :**जळगावहून तुझ्या वडिलांचे एक मित्र आले होते त्यांच्या मुलाला घेऊन. त्यांच्या मुलाला कॅन्सर झालाय. या मुंबईत माझ्याशिवाय त्यांच्या ओळखीचं कुणी नाही. म्हणून त्यांच्याबरोबर मला हॉस्पिटलमध्ये जावं लागलं. काही लागलं तर कुणी शिकलं संवरलेलं बरोबर असावं म्हणून सूनबाईला बरोबर घेऊन गेले.

**प्रभाकर :**अगं तिला घेऊन गेलीस त्याचं काही नाही ग आई. फक्त कुणालातरी सांगून जायचं म्हणजे आम्ही काळजी करीत राहिलो नसतो. बरं ते जाऊ दया आता.

**सुजाता :**वहिनी, आधी पहिल्यांदा किचनमध्ये चल. आज संध्याकाळच्या मेन्यूबद्दल

स्वयंपाकीण काकूंनी माझं डोकं खाल्लंय.

**उषा :** तू हो पुढे. मी आलेच दोन मिनिटात. [सुजाता आत जाते.]

**प्रभाकर :** या सगळ्या गडबडीत माझे अजून कपडे बदलायचे राहिलेत. मी जरा कपडे बदलून येतो. भदे तुम्ही आहात ना इथे ?

**भदे :** नाही. मी पण पाच मिनिटात जाऊन येतो.

**प्रभाकर :** कुठे ?

**भदे :** एक नवीन ब्रॅण्ड आलाय व्हिस्कीचा. घेऊन येतो. म्हणजे बाटली. अं हं.... 'नाही' म्हणायचं नाही. [जायला निघतात. थांबतात. मिसेस भदेना. ..] अहो बाई. तुम्ही का इथे नुसत्या उभ्या राहिल्यात? जरा आत जा. स्वयंपाकाला जरा मदत करा. करायला. खायला नाही. [शालू आत जाते. प्रभाकर बेडरूममध्ये जातो. भदे बाहेर जातात. उषा एकटीच विमनस्क उभी. आई जवळ येते.]

**आई :** मला वाटतं. आज जे काही घडलं. ते सारं प्रभाकरला सांगून टाक. उदयाच्या उदयाच. अगं, भर दुपारी एक गुंड तुला रिव्हाल्व्हरचा धाक दाखवून हॉटेलमध्ये खेचून नेतो. आणि आपण गप्प राहायचं? नाही हे बरोबर नाही. प्रभाकर पोलिसांना कळवून.

**उषा :** नाही, आई कृपाकरून हे त्यांना सांगू नका.

**आई :** सुनबाई मला एक समजत नाही. प्रभाकरला हे सगळं सांगायला तू नाही का म्हणतेस? अगं तुझा नवरा आहे ना तो ?

**उषा :** म्हणूनच मी नाही म्हणतेय. मी तिथे का गेले, कशी गेले हे सगळं विचारून नाना तऱ्हेच्या शंका निर्माण होतील त्यांच्या मनात. आणि मी कितीही किंवा सगळं खरं सांगितलं तरीही ते विश्वास तर ठेवणार नाहीतच. पण त्याच वेळेला त्यांच्यातला प्रेमळ पती हरवून जाईल आणि उरेल तो एक पुरुष, संशय घेणारा. आणि मग स्वतःच्याच वर्षानुवर्षाच्या मेहनतीनं उभं राहिलेलं हे सुंदर घरकुल क्षणार्धात मोडायला वेळ लागणार नाही म्हणून आई ही गोष्ट तुम्ही इतक्यात कुणाला सांगणार नाही असं वचन द्या मला. [दारावरची बेल वाजते. संभाषण तुटतं. उषा जाऊन दार उघडते. दारात भदे आणि पाठोपाठ देशपांडे. ]

**भदे :** या देशपांडे, या. [दोघेही आत येतात.]

**देशपांडे :** नमस्कार उषावहिनी [आईना पाहून] या आई ना ? नमस्कार.

**उषा :** आई, हे मिस्टर देशपांडे. यांच्या कंपनीत चीफ अकाउंटन्ट आहेत.

**आई :** नमस्कार. तुम्ही बसा मी प्रभाकरला पाठवते. [आत जातात]

**उषा :** मी ही जरा किचनमध्ये कुठपर्यन्त आलंय ते बघून येते. [ किचनमध्ये जाते. ]

**भदे :** [हाक मारतात] हरी हरी. [पिंकी येते.]

**पिंकी :**भदे काका तुम्ही हरीला हाक मारलीत?

**भदे :**हो. तू का आलीस ?

**पिंकी :**तुम्हाला एक पझल विचारायला

**भदे :**विचार.

**पिंकी :**जपानी भाषेत नोकराला काय म्हणतात?

**भदे :**नाही बुवा आपल्याला माहीत.

**पिंकी :**हात्तिच्या. जपानी भाषेत नोकराला म्हणतात. .. हाका नका मारू. [पळते ]

**देशपांडे :**भदे, आज पार्टीला ड्रिंक्स वगैरे आहेत की नाहीत? नाही म्हणजे साहेबांच्या आईना घरी असं काही चालत नाही असं ऐकलं होतं मी.

**भदे :**आता चालतं. प्रभाकर मॅनेजिंग डायरेक्टर झाला ना ? मी आईना समजावून सांगितलं. एम.डी.ना पार्ट्या दयाव्याच लागतात आणि पार्टीत दारू काम नसेल तर मॅनेजिंग डायरेक्टर-शिप काढून घेतात.

**देशपांडे :**छान. बाय द वे, म्हणजे. भदे, तुमचे प्रेमाचे खेळ कसे काय चालू आहेत?

**भदे :**चाललंय. देशपांडे हा एकच खेळ असा आहे की तो बॅडलाईटमध्ये 'स्टॉप' होत नाही तर 'स्टार्ट' होतो.

**देशपांडे :**तुमचं काय बाबा सगळं बिनधास्त भदे. मला तुमचा हेवा वाटतो. आमचं तुमच्यासारखं नाही. एकदम सरळ आयुष्य. म्हणजे इतकं साधं आणि बावळट की त्याला अर्थच नाही.

**भदे :**आय नो.

**देशपांडे :**मी तर इतका बावळट की लग्नाआधी मी माझ्या बायकोचं साधं किसही घेतलं नव्हतं.

**भदे :**काय सांगताय काय?

**देशपांडे :**अगदी खरं लग्नाआधी काही म्हटल्या काही नाही म्हणजे माझ्या बायकोचं लहानसं किस पण नाही भदे तुमचं काय किस काय आणखीनही काही झालं असेल.

**भदे :**मला नक्की आठवत नाही. पण काय नाव तुमच्या बायकोचं? [देशपांडे भदेना मारायला धावणार इतक्यात आतून शालूताई प्रवेश करतात.]

**भदे :**देशपांडे ह्या आमच्या सौभाग्यवती नाव शालिनी. नावाचा आणि गुणाचा काहीही संबंध नाही. आणि शालूताई आपलं. शालूबाई हे मिस्टर देशपांडे साधे देशपांडे. आणि साधे हे गुण आहेत. साधे ही इनिशियलस् नाहीत. बेडरूममधून प्रभाकर प्रवेश करतो. पाठोपाठ किचनमधून उषा

**प्रभाकर :**सॉरी जंटलमेन तुम्हाला वाट पाहायला लागली हं भदे तुमचं आवडतं काम हातात घ्या. बार टेंडरचं.

**देशपांडे :**भदे मला जरा बेतानंच.

**भदे :**तुमचं सगळंच बेताबेतानं असतं.

**देशपांडे :**बाय द वे. भदे तुमच्या लग्नाला किती वर्ष झाली?

**भदे :**कोणत्या या ना? चार.

**देशपांडे :**चार?

**भदे :**का खरं नाही वाटत? आमच्या हिच्याकडे पाहून. ? चार वर्षात काहीही फरक नाही. तोच आकार. तेच रूप. तोच ठसका.

**शालू :**तेच दागिने. तेच कपडे. त्याच साड्या.

**भदे :**पाहिलंत उषावहिनी. या बाईचं दु:ख काय तर कपडे आणि दागिने. अरे अरे. अगं निदान रिसेप्शनचा उडवलेला थाट तरी आठवायचास!

**शालू :**आठवतोय का नाही आठवणार? माझ्याच बाबाच्या पैशानं उडवलेला थाट. पण तुम्हाला आठवतंय का? माझ्यासारखी बायको मिळाली म्हणून कमीत कमी हजारभर माणसांनी तरी तुमचं अभिनंदन केलं.

**भदे :**आणि हजारो माणसांनी तुझ्याशी मी लग्न केल्याबद्दल माझे आभार मानले त्याचं काय ? [दारावरची बेल वाजते. सुजाता आतून येते दाराकडे जाते. शालू किचनमध्ये जाते. सुजाता प्रवेश करते. बरोबर राहुल.]

**सुजाता :**दादा राहुल आला.

**प्रभाकर :**आला? अरे, ही काय यायची वेळ झाली? काय हे? वेळ टळून गेली तरी घरच्या माणसांचाच पत्ता नाही.

**राहुल :**आय ॲम सॉरी सर. दुपारी एका फार महत्वाच्या कामात अडकून गेलो.

**सुजाता :**माहीत आहे आम्हाला. कुठं कशान बिझी होतास ते. सांगायची काही गरज नाही. [राहुल-उषाची नजरानजर. उषा दूर जाते.]

**प्रभाकर :**मिस्टर देशपांडे मीट धिस यंग मॅन. राहुल देसाई. व्हेरी ऑनेस्ट ॲण्ड कॅपेबल यंग बॉय.

**राहुल :**प्लीज...

**प्रभाकर :**खोटं नाही देशपांडे. खूप गुणी मुलगा आहे हा.

**भदे :**माझ्यासारखा.

**प्रभाकर :**बरं काय घेणार? व्हिस्की? बिअर?

**राहुल :**त्यात मला काही कळत नाही. [उषा जिथं आहे तिथं जातो.] कसं काय उषा

वहिनी? [सुजाता आत जाते.]

**उषा :** इथं यायची तुझी हिम्मत कशी झाली?

**राहुल :** मला वाटतं माझं जाणं येणं अचानक बंद झालं तर लोकांना उगाचच संशय येईल.

**उषा :** [क्षणभर स्तब्ध] त्या गुंडांचा पत्ता लागला?

**राहुल :** कृपा करून मला त्याची आठवण करून देऊ नका. त्याचा नुसता चेहरा जरी डोळ्यासमोर आला तरी शरीरातून वीज चमकून जाते. थोड्याच दिवसात मी ही नोकरी सोडून जातोय. मी आता कायमचा नाशिकला....

**उषा :** नाशिकला ?

**राहुल :** मला भीती वाटते. मला खरंच भीती वाटते.

**उषा :** पण मग तो मला एकटीला छळील त्याचं काय?

**राहुल :** मला वाटतं आपण हे सारं मिस्टर देशमुखांना सांगायला हवं.

**प्रभाकर :** [पुढं येत] मघाशी काय सांगत होतास तू ?

**राहुल :** मी. हं. मला असं सांगायचं होतं...

**उषा :** छे छे ! काहीतरी काय ! तुला कुठं काय सांगायचं होतं ?

**राहुल :** वा. असं कसं. ? तर....

**उषा :** तू सॉफ्ट ड्रिंक पण घेणार नाहीस ?

**राहुल :** सर, मला असं सांगायचं होतं, [उषा टेन्स] की उशीर झाला तर सबब सांगण्यात अर्थ नसतो [प्रभाकर हंसत हसत दूर जातो.] मी आतां सांगणार नव्हतो. पण कधीतरी ते सांगायला हवं.

**उषा :** नाही. ते शक्य नाही.

**राहुल :** मी त्यांची समजूत घालीन. त्यांना सांगेन की हे सारं माझ्यामुळे झालं. त्यांची माफी मागीन.

**उषा :** त्यांचा विश्वास बसणार नाही. घरी कुणालाही न सांगता मी त्या हॉटेल रूमवर कशासाठी गेले होते असं मला विचारलं तर काय उत्तर आहे माझ्याकडे ? आईशी सुध्दा मी खोटं बोलले. मला माहीत्येय मी जरी जीव तोडून काहीही सांगितलं तरी कुणीही त्यावर विश्वास ठेवणार नाही.

**सुजाता :** [अचानक टपकते.] राहुल, तुला भूक लागली असेल नाही ? व्हाय डोंट यू हॅव समथिंग ? [उत्तराची वाट न पाहता] थांब मी तुझ्याकरिता काहीतरी घेऊन येते. [किचनमध्ये जाते.]

**प्रभाकर :** अरे राहुल, असा नुसताच काय उभा आहेस? काही सॉफ्ट ड्रिंक वगैरे. उषा

त्याला दे काही तरी. कम ऑन.

**उषा :**[त्याच्या हातात सॉफ्ट ड्रिंक देत] घे ना.

**राहुल :**यातून सुटकेचा एक मार्ग मला दिसतो. त्या हरामखोर बदमाशाचं पुन्हा तोंडही पहावं लागणार नाही. आणि आपल्या केसालाही धक्का लागणार नाही.

**उषा :**कोणता मार्ग ? आपण काय करायला हवं ?

**राहुल :**आपण नाही तुम्ही.

**उषा :**मी ? मी एकटीनं ?

**राहुल :**पन्नास हजार रूपये जास्त नाही. फक्त पन्नास हजार रूपये याक्षणी मला रोख दयायचे आणि तुम्ही सुटायचं.

**उषा :**पन्नास हजार रूपये ? तुला दयायचे ?

**भदे :**अरे काय चाललंय काय ?

**उषा :**काही नाही

**भदे :**यंग मॅन, आय हॅव अ डाऊट .

**उषा :**तसं काही नाही आमचं साधं बोलणं चाललंय.

**भदे :**नाही. हे खरं नाही.

**राहुल :**काय खरं नाही ?

**भदे :**तुमच्या ग्लासात 'लिमका' आहे कां जीन विथ लिमका आहे ?

**उषा :**हा डाऊट ?

**भदे :**हो कां ? लेट मी सी. [वास घेतो.] प्युअर लिमका. अजून बाळच आहेस तू. [जातात]

**राहुल :**मी काय म्हटलं ?

**उषा :**ऐकलंय मी. आणि मी पन्नास हजार नाही दिले तर?

**राहुल :**नाहीतर मग हे. [खिशातून चावी काढून उषाच्या पायाशी फेकतो.]

**उषा :**हे काय ?

**राहुल :**हा दुसरा मार्ग. या गरीब माणसावर मेहेरबानी करायची. एक दुसरी पण शेवटची संधी.

**उषा :**शेवटची संधी.

**राहुल :**होय. शेवटची संधी. तीच वेळ. तेच हॉटेल. तीच रूम आणि पलंगही तोच. फक्त....

**उषा :**राहुल....

**राहुल :**फक्त बदल म्हणून यावेळी रूमच्या दाराचं कुलूप या चावीनं तुम्ही स्वत उघडायचं आणि प्रवेश करायचा.

**उषा :**म्हणजे...

**राहुल :**म्हणजे आज दुपारी, तुम्ही उधळून टाकलेला, अर्धवट राहिलेला तो सीन तुम्ही पूर्ण करायचाय. आणि अपमानाचे वार केलेल्या या राहूलची त्याच्या पायाशी बसून माफी मागायची. बस्स

**उषा :**आणि मला हे मान्य नसेल तर.

**राहुल :**तर काय घराण्याची अब्रू कापरासारखी जळताना उघड्या डोळ्यांनी पहायची आणि धन्य व्हायचं. ते फोटो....

**उषा :**म्हणजे ती फोटो काढणारी माणसं..

**राहुल :**माझी माणसं होती. मी विकत घेतलेली भाडोत्री. [घड्याळ्यात बघतो. तेवढयात डोअरबेल वाजते.] उषावहिनी आजच्या ह्या पार्टीची शान वाढवणारी खास चीज मागवली आहे मी. काश्मिरी बदाम आणि खारे काजू झक मारतील त्याच्यापुढे. [दारात प्रभाकर बरोबर तो आगंतुक दिसतो.]

**प्रभाकर :**राहुल समवन टू सी यू. [राहुल दारापाशी जातो. त्याचे बोलणं होतं. तो इसम उषाला पाहातो. तो राहुलच्या हाती एक पाकीट देतो. उषाला सलाम करतो. आणि निघून जातो.]

**उषा :**मला असं छळून तुला काय मिळणार आहे ?

**राहुल :**हा छळ नाही बाईसाहेब हा निव्वळ व्यवहार आहे. प्रेम किंवा पैसा यातलं एक काहीतरी तुम्ही मला दयायलाच हवं. आणि या दोहोपैकी काहीच दयायची इच्छा नसेल तर माझ्यापाशी दयायला काहीतरी आहे. या व्हिस्कीबरोबर मंचींग करायला आपले फोटो दयायची कल्पना कशी काय वाटते तुम्हाला ?

**उषा :**मला दोनचार दिवसाची सवड दे. एकदम पन्नास हजार रूपये मी कुठून आणू

**राहुल :**हं. तेही खरंच. पंधरा हजार तर घरात निघतील. म्हणजे माझी खात्री पटवायला, 'बाबा, पार्टी तयार आहे' बाकीचे चार दिवसानी दया.

**उषा :**पण पंधरा हजार.

**राहुल :**सॉरी पहिल्या हप्त्यात पंधरा हजारला एक पै कमी होणार नाही. आपण इथून बेडरूममध्ये, टेबलाच्या खणात, तिजोरीत, साहेबांच्या खिशात, चार ठिकाणी हात घाला कुठेतरी पैसे मिळतीलच. अगदीच नाही मिळाले तर सासूकडून कर्ज घ्या. मी फक्त दहा मिनिटांचा अवधी देत आहे. या दहा मिनीटात पंधरा हजार रूपये हजर झाले नाहीत तर अकराव्या मिनीटाला हे पाकीट तुमच्या गजमानांच्या हातात असेल. ॲंड दॅटस फायनल. नाऊ गेट गोईंग.

[रंगमंचाच्या दुसऱ्या भागात....]

**प्रभाकर :** मला नाही वाटत शिरोडकर आता येईल.

**प्रभाकर :** एक महत्वाची गोष्ट करायची राहिली. आलोच हं मी दोन मिनीटात. [आत जातो.]

**[रंगमंचाच्या पहिल्या भागात.... सुजाता प्रवेश करते. राहुल तिच्याजवळ येतो.]**

**सुजाता :** एक अक्षर बोलू नकोस माझ्याशी.

**राहुल :** आय ॲम रिअली सॉरी सुजाता. पण प्रयत्न करूनही मी नाही येऊ शकलो. परिस्थितीच तशी होती.

**सुजाता :** आणि मी मात्र मुर्खासारखी रणरणत्या उन्हात साडेतीन ते साडेचार तास भर तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. यायचं नव्हतं तर कालच तसं सांगायचं होतंस. नेहमी सांगतोस तसं.

**राहुल :** मी तुझा फार मोठा अपराध केलाय सुजाता. तू देशील ती शिक्षा मला मान्य आहे.

**सुजाता :** 'तू देशील ती शिक्षा मला मान्य आहे' म्हणे. एखादया राजाची लाडावलेली राजकन्याच नाही का मी? की आलं मनात की चढवलं सुळावर कुणालाही. तुला माहीत आहे की मी एक सामान्य मुलगी आहे. जिची कुणीही उपेक्षा करावी, उन्हात तासनतास ताटकळत ठेवावी.

**राहुल :** ठीक आहे. उदया मी एशियाटिकजवळ तापलेल्या उन्हात तुझी वाट पाहात उभा राहातो. मग तर झालं? उन्हानं भाजून काढलं तरी हरकत नाही. कंटाळून जायचं म्हटलं तरी माझी सावली मला जाऊ देणार नाही. म्हणेल अरे वेडया, चाललास कुठं? तुला जायचंय तर जा. पण मला खात्री आहे. तुझी सुजाता चुकणार नाही. ती नक्की येईल [दोघेही हसतात.]

**सुजाता :** तू असा आहेस. कितीही मनात आलं तरी तुझ्याशी मी नाही वाईट वागू शकत. [प्रभाकर आईला घेऊन प्रवेश करतो.]

**प्रभाकर :** एक मिनीट. जरा इकडे लक्ष दया. मला एक अतिशय महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. एक अतिशय आनंदाची बातमी. आमच्या घरात लवकरच एक मंगल कार्य होणार आहे. माझ्या लाडक्या बहिणीचं, सुजाताचं लग्न. कुणाशी माहीत आहे ? तिला शोभेसा उमदा, सुस्वभावी, सज्जन जोडीदार, राहुल देसाई. दे आर गेटींग एंगेज्ड सून. सो थ्री चिअर्स फॉर सुजाता ॲण्ड राहुल हिप हिप हुर्रे.... [सारीजण 'चीअर्स' करीत असतानाच बेडरूममधून उषा वेगाने प्रवेश करते. हातात पैशाची पिशवी या साऱ्या प्रकाराकडे ती असहाय्यतेने पाहात असतानाच. ]

**[अंधार : दृश्य समाप्त]**

# अंक दुसरा [दृश्य – २]

[घराचा दिवाणखाना  चार दिवस उलटून गेले आहेत.
वेळ संध्याकाळची. उषा फोनवर बोलत आहे.]

**उषा :**हॅलो मी मिसेस देशमुख बोलतेय. हो ऽ मजुरी किती झाली ? इतकी. ? जुनं बिल तुमच्याकडे आहे. बरोबर. दोन बांगड्या. एक गोफ आणि एक अंगठी. बिलाप्रमाणे सोळाहजार रूपये होतात. बरोबर ना? नाही नाही. पाठवू नका. मी स्वतः पैसे न्यायला येअीन. एक गोष्ट लक्षात ठेवा हे कुणालाही कळता कामा नये. अगदी कुणालाच. मिस्टर देशमुखाना पण नाही. [फोन खाली ठेवते. वासू प्रवेश करतो.]

**वासू :**सलाम मेमसाब. ही रिसिट आणलीय. जरा पाहून घ्या. [उषा रिसिट पाहाते.]

**उषा :**ठीक आहे. तू गेलास तरी चालेल. ही रिसिट त्या टेबलावर ठेव. [सुजाता प्रवेश करते]

**सुजाता :**वहिनी राहुलचा फोन आला होता ?

**उषा :**नाही.

**राहुल :**या माणसाची पण कमाल आहे. सकाळपासून मी फोनची वाट पाहतेय. रात्री पिक्चरला जायचं ठरलंय. पण कुठलं पिक्चर ? थिएटर कुठलं ? शो कितीचा ? काहीही सांगितलं नाही. [वासूला पाहून] तुझं काय काम आहे इथं वासू ? दिवसभर चकरा मारतोयस?

**वासू :**काही नाही मेमसाब. रिसिट दयायला आलो होतो. चाललोच आहे आता थोडं पाणी मिळेल. ?

**सुजाता :**हरी. एक ग्लास पाणी घेऊन ये

**वासू :**तुमचं लग्न ठरलंय असं ऐकलं. तुमच्याकडे येणाऱ्या त्या मास्तर. मास्तर साहेबांशी. आपल्याला सांगितलं पण नाही.

**सुजाता :**अरे, तुला काय सांगायचं? तू कोण ? स्वतःला गव्हर्नर समजतोस की काय ? [हरी पाण्याचा ग्लास घेऊन येतो.] दे त्याला. [टेलिफोनची बेल वाजते.] थांब वहिनी मी घेते फोन नक्कीच राहुलचाच असेल. [वासूला] तू कशाला थांबलास ? पाणी पी आणि जा आता. [टेलिफोनची घंटी वाजतच राहते. सुजाता टेलिफोन घेते]

**सुजाता :**नक्की राहुलचाच फोन [फोनवर] धिस इज टू मच. दुसऱ्याचा काही विचार. इथे मी दिवसभर टेलिफोनची वाट पाहातेय. हॅलो. हॅलो. [फोन ठेवते.]

**उषा :**कुणाचा होता फोन ?

**सुजाता :**कोण जाणे कुणाचा होता. कुणी बोलतच नव्हतं. नुसतं हॅलो हॅलो.

**वासू :**बरं आहे मेमसाब. मी जातो. लग्नाचं व्हिडिओ शूटींग करायचं असेल तर सांगा आपल्याला. आपल्या दोस्ताचा कॅमेरा एकदम नवीन आहे. स्वस्तात करून देऊ. अगदी खरं.

**सुजाता :**[चिडून] तू जातोस का नाही आता इथून ?

**वासू :**जातो. अशा नाराज नका होऊ. जातोच मी . [जातो.]

**सुजाता :**वहिनी माझ्याकरिता मी कॉफी करतेय. तू घेणार थोडी?

**उषा :**नको. माझी आत्ताच झालीय. [सुजाता किचनमध्ये जाते. फोनची बेल वाजते. उषा धावत जाऊन फोन उचलते.]

**उषा :**हॅलो हॅलो ऽ मी तुला किती वेळा सांगितलं की तू इथे मला फोन करायचा नाहीस. काय काम आहे माझ्याशी ? अर्ध्याहून अधिक पैसे मी दिलेच आहेत ना ? उरलेले मी.... [बाहेरून पिंकीच्या रडण्याचा आवाज, उषा फोन ठेवते. पिंकी रडत प्रवेश करते.]

**उषा :**आलीस ? चला आता हातपाय धुवून कपडे बदलून दूध प्यायचं आणि मग खेळायला जायचं.

**पिंकी :**मला नाही दूध प्यायचं. मला जेवायचं पण नाही.

**उषा :**अरे, अरे, एवढं काय झालं ? शाळेत बोललं का कुणी ? कुणाशी भांडण बिंडण झालं का ? अग सांग तरी काय झालं ते .

**पिंकी :**मला नाही काही सांगायचं.

**उषा :**तुला कुणी मारलं का ?

**पिंकी :**हो

**उषा :**कुणी मारलं ? सांग कुणी मारलं ?

**पिंकी :**सरांनी.

**उषा :**सरांनी ? राहुलनी ? [पिंकी रडत रडत हो म्हणते] हे बघ पिंकी मला सगळं नीट सांग. आधी रडणं बंद कर पाहू. सांग काय झालं.

**पिंकी :**मम्मी, मम्मी, खरंच माझी काही चूक नव्हती. इंग्लीशच्या पिरियडला माझ्या बाजूची मुलगी कुणाशी तरी बोलत होती. तर सर माझ्यावरच भडकले. शिक्षा म्हणून मला वर्गाच्या बाहेर काढलं. मी त्यांना टीचर्स रूममध्ये भेटायला गेले. माझी काही चूक नाही हे सांगायला. पण माझं काही ऐकून घ्यायच्या आतच सरांनी सगळ्यांच्या देखत माझ्या थोबाडीत मारली. [रडायला लागते.] मम्मी उदयापासून मी शाळेत जाणार नाही. मला नको ती शाळा. मला दुसऱ्या शाळेत

घाल.

**उषा :**हे बघ बेटा रडू नकोस. राहुल आला की मी सांगेन त्याला. जा बघू आता आत. [पिंकी आत जाते.] त्याच्या मनात काय आहे तेच समजत नाही. [बाहेरून भदे, प्रभाकर आणि आई प्रवेश करतात.]

**भदे :**जास्तीतजास्त सात-आठशे असतील ना ? आई तुम्ही काही चिंता करू नका. एका आठवड्याचं काम. मी आमच्या मिसेस आणि उषावहिनी तिघंही बोलावणी करायला बाहेर पडू. गाडी असल्यावर कितीसा वेळ लागणार आहे ?

**प्रभाकर :**हॉलचं नक्की झालंय ना ? ११ डिसेंबरची तारीख ?

**भदे :**घ्या. उषावहिनींनी नाही सांगितलं ? कालच पैसे भरले. रिसीट आणि उरलेले दोन हजार उषावहिनींकडे दिलेत.

**उषा :**अरे हो, हे सांगायचंच राहिलं. पैसे माझ्याकडे आहेत आई.

**आई :**असू देत तुझ्यापाशी. कमी का खर्च आहे ? एकामागून एक चाललंच आहे. भदे, सूनबाईला जरा दागिन्यांची यादी वाचून दाखवा. आपण नक्की केलेली.

**भदे :**चार बांगड्या, दोन पाटल्या, दोन तोडे, एक मोहनमाळ, कोल्हापुरी साज, वेल, एक हिऱ्याची चमकी, हिऱ्याच्या कुड्या, एक हिऱ्याची अंगठी, एक मोत्यांचा सेट, आणि राहुलसाठी दोन तोळ्यांची चेन.

**प्रभाकर :**भदे, लग्नं इतकं झोकात व्हायला पाहिजे की लोकांनी नाव काढलं पाहिजे. पेपरमध्ये ओळखी असतील तर काही पेपरवाल्यांनाही बोलावू या. तेवढीच बातमी आणि फोटो छापून येईल.

**भदे :**या पेपरवाल्यांचे काही खरं नाही. बातम्या इतक्या त्रोटक छापतात आपण 'फिल इन द ब्लँक्स' करून अर्थ लावून घ्यायचा. आज सकाळीच एक बातमी वाचली. ''काल रात्री हायवेवर श्री. कापरेकर यांनी अंधारात गाडीत पेट्रोल आहे की नाही हे पाहण्यासाठी आगकाडी पेटवली. गाडीत पेट्रोल होतं. श्री. कापरेकर ३२ वर्षांचे होते.'' आता बोल. बरं ते जाऊ दे. रात्रीची आठवण आहे ना ? सगळ्यांनी आमच्याकडे केळवणाला यायचंय. विसरायचं नाही. आई, तुम्ही कुठे बाहेर जेवत नाही मला माहीतेय. तुमच्याकरिता डबा पाठवीन. घरी काही करायचं नाही. तर मी चलू ? [जातात. क्षणभर स्तब्धता. प्रभाकर उषाजवळ येतो.]

**प्रभाकर :**तुला बरं नाही का वाटत ? डोकं दुखतंय?

**उषा :**नाही का ? असं का तुम्हाला वाटतंय ?

**प्रभाकर :**गेले कित्येक दिवस मी पाहतोय. तुझं लक्षण ठीक दिसत नाही. मन थाऱ्यावर नाही तुझं.

**उषा :**खरं तसं काही नाही.

**प्रभाकर :** तुला हे लग्न पसंत नाही कां ?

**उषा :** कुणी सांगितलं तुम्हाला असं ?

**प्रभाकर :** तुझ्या वागण्यावरून तसं वाटतं. आई किती उत्साहानं लग्नाच्या तयारीला लागली आहे. बाहेरगावी पत्रिका पाठवायला सुरूवात झाली. तुझ्या एकुलत्या एक लाडक्या नणंदेचं लग्न निघालंय आणि तुला त्यात काडीचाही रस नाहीये.

**उषा :** तसं नाही हो. सुजाताच्या लग्नाचा मला नाही आनंद होणार तर कुणाला ? खरं सांगू का ? गेले काही दिवस मला खरंच बरं वाटत नाही.

**प्रभाकर :** हे बघ, घरात लग्न निघालय आणि अशी हयगय करून चालायचं नाही. [बोलता बोलता हातात हात घेतो.] आपण चांगल्या डॉक्टरांना तुझी तब्येत दाखवू. हे काय ? तुझ्या बोटातली अंगठी कुठंय ?

**उषा :** अं. मला वाटतं बाथरूममध्ये आंघोळ करताना...

**प्रभाकर :** बाथरूममध्ये ? पण तू तर अंगठी कधीच काढत नाहीस.

**उषा :** नाही. नाही. बाथरूममध्ये नाही. हं. आलं लक्षात. सोनाराकडे दिली आहे पॉलीश करायला. येईल तीन चार दिवसात.

**प्रभाकर :** ठीक आहे. [बेडरूममध्ये जातो. टेलिफोनची बेल वाजते. उषा धावत जाऊन फोन उचलते.]

**उषा :** कोण राहुल ? स्वतःला काय समजतोस तू ? एका लहान पोरीवर हात टाकायला तुला शरम नाही वाटली ? तुला मला जितका त्रास दयायचाय तितका दे. जितकं छळायचंय तितकं छळ. पण माझ्या पोरीवर जर पुन्हा हात टाकलास तर तोच हात तोडून टाकीन मी. तुझे राहिलेले सारे पैसे तुला उदया मिळतील. त्याची काळजी करायचं तुला कारण नाही. माझे दागिने विकून, स्वतःला गहाण टाकून मी पैसे उभे करीन. आणि तुझं देणं चुकवीन. या गोष्टीचा आणि पिंकीचा काय संबंध ? पिंकीन सगळं काही सांगितलंय मला. यापुढं माझ्या पोरीच्या अंगावर हात टाकायच्या आधी आपला चेहरा आरशात पाहून घे म्हणजे तू काय लायकीचा माणूस आहेस हे तुझं तुला समजेल. [फोन ठेवते. सुजाता आतून बाहेर येते.]

**सुजाता :** कुणाचा होता फोन ? राहुलचा ?

**उषा :** हो.

**सुजाता :** मला का नाही बोलावलंस ?

**उषा :** मला तशी जरूरी नाही वाटली.

**सुजाता :** तुला तशी जरूरी नाही वाटली ? या घरात राहुलचा फोन येतो आणि तुला मला सांगायची जरूरी नाही वाटली ?

**उषा :**या घरी राहुलचा फोन पहिल्यांदाच नाही आला.

**सुजाता :**मान्य आहे. पण त्यावेळची गोष्ट वेगळी होती. आणि आजची गोष्ट वेगळी आहे. आता तो या घराच्या मालकाच्या एकुलत्या एका बहिणीचा भावी पती आहे. एक तास मी त्याच्या फोनची वाट पाहतेय. आणि हे माहीत असूनही त्याचा फोन आल्याचं मला सांगायची तुला गरज नाही वाटली ? मला खरंच आश्चर्य वाटतं वहिनी. मला खरंच आश्चर्य वाटतं.

**उषा :**वाईट वाटणार नसेल तर एक सांगू ? तुला एवढी घाई काय झालीय ?

**सुजाता :**घाई ? तुला काय म्हणायचंय वहिनी ? लग्न करण्याची मी घाई करतेय असं वाटतं तुला. ?

**उषा :**स्वत:च्या मनालाच विचार. ही घाई नाहीये. ?

**सुजाता :**वीस वर्ष पुरी झालेल्या मुलीनं संसार मांडायचं स्वप्न पाहणं म्हणजे घाई?

**उषा :**हो घाईच. वीसच वर्ष पुरी म्हणजे घाई नाही ? तू अजून ग्रॅज्युएटही नाही झालीस. काळ बदललाय. मुलींनी मागं न राहता शिकून सवरून पुढं जायला हवं.

**सुजाता :**आणि पुढं काय ? शेवटी संसारच करायचा ना ?

**उषा :**हो पण....

**सुजाता :**आणि त्या संसाराचा जोडीदार आताच निवडून ठेवणं म्हणजे नुसतं पुढं जाणं नाही तर सगळ्यांच्याही पुढं.

**उषा :**सगळ्यांच्या म्हणजे ? सगळ्यांच्या प्रश्नच कुठं येतो ? ही काय जोडीदार निवडायची कॉम्पिटिशन आहे ?

**सुजाता :**म्हटलं तर आहे.

**उषा :**समजू दे तरी. एका मल्टी नॅशनल कंपनीच्या मॅनिजिंग डायरेक्टरच्या एकुलत्या एक सुंदर बहिणीशी कोण स्पर्धा करू शकणार आहे ते.

**सुजाता :**तसं पहायला गेलं तर कुणीही नाही. पण म्हटलं तर आहेही.

**उषा :**जाऊ दे. असे अडचणीत आणणारे प्रश्न मी तुला नाही विचारत. पण एक मात्र लक्षात ठेव. माणसानं स्पर्धा चांगल्या गोष्टी मिळवण्यासाठी करावी. वाईट गोष्टीसाठी नव्हे.

**सुजाता :**समजले नाही मी.

**उषा :**माणसानं स्पर्धा करावी ते शिखर गाठण्यासाठी दरीचा तळ गाठण्यासाठी नव्हे.

**सुजाता :**वहिनी?

**उषा :**जरा विचार कर तू. तुझं घराणं, पैसा, रूप, काय कमी आहे तुझ्याकडे ? एकापेक्षा एक चांगली स्थळं. जीव टाकतील तुझ्याकरिता. मनासारखा जोडीदार

तू मिळवू शकशील आणि आयुष्यभर राजाच्या राणीसारखी राहू शकशील.

**सुजाता :** आणि हे वैभव टिकविण्याकरिता तो माझा जोडीदार एखादया मल्टी नॅशनल कंपनीच्या कारभारात बुडून जाईल. आणि एकदा मुलं झाली की मला विसरून जाईल मला, माझ्या शरीराला आणि माझ्या मनालासुध्दा. मग मी काय करायचं. ? वेळ घालविण्यासाठी मुलांना शिकविण्याच्या निमित्ताने कुणालातरी नोकरीवर ठेवायचं ?

**उषा :** म्हणजे ?

**सुजाता :** एक विचारू वहिनी ? तुझी शेवटची परीक्षा तू लग्न झाल्यावर दिलीस. संसाराची जबाबदारी सांभाळूनही इंग्लीश आणि मॅथ्समध्ये तुला सिक्स्टी पर्सेन्ट मार्कस मिळाले. मग मुलांना इंग्लीश आणि गणित शिकवायला मास्तर ठेवायची गरज तुला का भासली ?

**उषा :** तुला काय म्हणायचंय ? राहुलची शिकवणी मी ठेवली ?

**सुजाता :** ठेवली कुणी का असेना. टिकून तर तुझ्यामुळे राहिलींय ना ? मी तर केव्हांच एस.एस.सी झाले आणि पिंकीतर खूप लहान होती शिकवणी साठी.

**उषा :** सुजाता, काय म्हणायचंय तुला ?

**सुजाता :** मला एकच सांगायचंय. आपली घटका दोन घटकांची मौज अशीच चालू राहावी म्हणून कुणाच तरी फुलणारं स्वप्न उधळायचा तुला काहीही अधिकार नाही.

**उषा :** सुजाता ! [आश्चर्य]

**सुजाता :** गणित आणि इंग्लीश शिकवणारा गोरागोमटा मास्तर तुला कुठंही मिळेल वहिनी. पण मला दुसरा राहुल नाही मिळणार.

**उषा :** म्हणजे सुजाता मी ?

**सुजाता :** तू त्याच्यावर काय जादू केलीयस मला काही कळत नाही. एखादया चेटकिणीसारखा त्याचा जीव मुठीत बंद करून ठेवलायस. आणि खेळवत आहेस त्याला. एक जीव घेणा खेळ....

**उषा :** तसं नाही सुजाता. तुला कल्पना नाही. तो माणूस किती हीन वृत्तीचा आहे. किती निर्दय आहे.

**सुजाता :** इतकी वर्ष त्याला खेळवून, आपल्या मुठीत ठेवून त्याला खुळं केलंस. आणि आजच एकदम त्याच्याविषयी असं काय बोलतेस ? मला खरंचं समजत नाही.

**उषा :** त्याची दानत खरोखरच चांगली नाहीये.

**सुजाता :** कुणाची दानत चांगली नाहीये ? एका विवाहित स्त्रीला प्रेयसी समजून तिची पूजा करणाऱ्या अविवाहित तरूणाची ? की चार दिवस मौज मजा करून,

त्याला प्रेमाच्या भ्रमात ठेवून, केवळ वेळ घालवायचं साधन म्हणून त्याचा उपयोग करणाऱ्या विवाहित स्त्रीची ? कुणाची दानत चांगली नाही. ?

**उषा :** सुजाता जरा मला समजून घे.

**सुजाता :** समजून घ्यायचं ते सगळं समजून चुकलेय मी वहिनी. गेली तीन वर्षे राहुलचं हो नाही चाललंय. पण आज त्यानं मला "हो" म्हटलंय. मला त्याच्याशी लग्न करायचंय वहिनी. तू का आमच्या आड येतेस ?

**उषा :** तसं नाहीये. सुजाता, कसं समजावूं तुला ? तुला सारं माहीत असतं. त्या रात्री झालेलं आमचं दोघांचं बोलणं तू आमच्या नकळत ऐकलं असतंस तर कळलं असतं. तुझ्या वहिनीला तू जशी समजतेस तशी ती नाहीये. [दारात राहुल. सुजाता राहुलकडे जाते]

**सुजाता :** राहुल. छान नेहमीप्रमाणे उशीर केलासच. तू बस मी आलेच.

**राहुल :** म्हणजे तू तयार नाहीस आणि मला बोलतेस.

**सुजाता :** बस रे. जास्त नाही. आलेच मी दोन मिनिटात. [आत जाते.]

**राहुल :** ओ. के. बी-क्विक. [उषा बेडरूमकडे जायला निघते. राहुल तिचा हात पकडतो. ती झटक्यात हात सोडवून घेते.]

**उषा :** खबरदार. अंगाला हात लावलास तर.

**राहुल :** मला माहीत आहे, काही मुद्द्यांवर आपले मतभेद आहेत. तुम्ही मला अस्पृश्य समजता. तर मी स्पर्शासाठी आसुसलोय, तळमळतोय.

**उषा :** आणखी काही घाणेरडं बोलायच्या आत एका गोष्टीची आठवण करून देते. हे एक खानदानी कुटुंबाचं घर आहे. एखादया घाणेरड्या हॉटेलातली भाड्याची खोली नाही.

**राहुल :** त्याची आठवण करून दयायची गरज नाही. मिसेस देशमुख. मला माहीत आहे ते. कारण याच घराच्या दिवाणखान्यात थोड्याच दिवसात घरजावई म्हणून मी इथं येणार आहे. आणि माझ्या नजरेच्या नुसत्या इशाऱ्यावर तुम्ही स्वतःला माझ्या स्वाधीन करणार आहात. याच घराच्या चार भिंतीआड.

**उषा :** तशी वेळ येण्याआधी मी जीव देईन.

**राहुल :** जीव देणार ? च्.. च्.... उषावहिनी, माणसानं जीव घेण्याची हिंमत बाळगावी.

**उषा :** मी हात जोडते तुला. माझा किती अंत पहाणार आहेस तू ?

**राहुल :** ही नुसती सुरवात आहे. तुम्हाला काय वाटलं पन्नास हजार दिले की संपलं सारं ? नाही नाही. असं कसं ? आपल्या दोघांचे ते फोटो. ती हुकूमाची पानं माझ्यापाशी अजून तशीच आहेत. माझ्यापासून सुटका हवीय ना ? मग मला

नाराज करून कसं चालेल ? माझी       पुरी करा. बस्स. नाहीतर मी जिवंत असेपर्यन्त असा छळत राहीन.

**उषा :** राहुल, आयुष्यात कधीच कुणापुढे हात पसरले नाहीत मी. पण आज तुझ्याकडे दयेची भीक मागते. हा खेळ थांबव आता.

**राहुल :** हं . तुमच्या माहितीकरिता आणखी एक गोष्ट सांगतो. तुमची लाडकी नणंद सगळा धीर एकवटून तिनं मन तयार केलंय. उदया ती या गरीबावर फार मोठी मेहेरबानी करणार आहे.

**उषा :** म्हणजे ?

**राहुल :** म्हणजे लग्नाला होकार दिला ना मी ? म्हणून सेलीब्रेट करणार आहोत. मला हवं ते सारं काही देणार आहे ती. अगदी सारं काही. पुन्हा प्रेमानं. भरभरून. पहिल्यांदा लंच. मग थोडंसं शॉपिंग मग तेच हॉटेल. तीच खोली. जिथं माझ्या भावनांची राख झाली तिथं आम्ही दोघे यौवनाचा उत्सव साजरा करणार.

**उषा :** तुला लाज कशी नाही वाटत ? अरे, जिच्याशी तुझं लग्न ठरलंय.

**राहुल :** कुणाचं लग्न ठरलंय. ? कुणाशी ? उषावहिनी, मला तुम्ही हव्या आहात. सुजाताशी लग्न ही केवळ एक पायरी. तुमच्यापर्यन्त पोहोचण्यासाठी. मग मला तिची गरज नाही. माझं खरं लक्ष्य. तुम्ही आहात. फक्त तुम्ही . [सुजाता प्रवेश करते.]

**सुजाता :** चल राहुल, निघू या ना. [दरवाजापर्यन्त जाते ]

**राहुल :** अग, हो हो. उषावहिनींना जाताना सांगणार पण नाहीस ? त्यांच्यामुळे आपले लग्न जमलंय हे इतक्यात विसरलीस ?

**सुजाता :** ओ हो. आय ॲम सॉरी. बाय वहिनी. बघ, माझी पण कमाल आहे. पर्सच विसरले. एक मिनिट. आत्ता येते. [आत जाते. ]

**राहुल :** उषावहिनी आता खरी कसोटी आहे तुमच्या खंबीरपणाची. आणि माझ्या हट्टीपणाची. तुमच्या लाडक्या नणंदेच्या आयुष्याचा सत्यानाश तुम्हाला उघडया डोळ्यांनी पहायला आवडणार असेल तर रहा चिकटून शेवटपर्यन्त तुमच्या नकाराला आणि नमतं घेतलंत तर शेवट गोड होईल. शांतपणे विचार करा. पण लवकर. कारण वेळ फार थोडा आहे. [राहुल बाहेर जातो. सुजाता आतून बाहेर येते.]

**सुजाता :** शांत रहा वहिनी. शांत रहा. राहुलला वाटतंय तसं या छोट्याशा वादळानं हे घर कोसळून नाही पडणार.

**उषा :** सुजाता.    ?

**सुजाता :** तुमचं सगळं बोलणं मी ऐकलंय. आणि या घराची इज्जत सांभाळण्याची तुझी

जी धडपड चाललीय त्यात मी तुला मदत करीन. [जाते.]

**उषा :**सुजाता सुजाता. .. [हसते. हसता हसता रडते. ]

**[अंधारः दृश्य समाप्त]**

## अंक दुसरा [दृश्य – ३]

[घराचा दिवाणखाना. वेळरात्री आठ साडेआठची. उषा आणि सुजाता बोलत आहेत.]

**सुजाता :**इतकं सारं घडून तू गप्प राहिलीस वहिनी? राहुलनं केलेला छळ निमूटपणे सोसत राहिलीस ? का ? कुणालातरी सांगायचंस. निदान आईलातरी घडलेलं सारं सांगायचंस.

**उषा :**कुणी विश्वास ठेवला असता माझ्यावर ? हात जोडून पदर पसरून जरी सांगितलं असतं. तरी कुणी विश्वास ठेवला नसता. राहुलनं हॉटेलातली रूमही माझ्या नावावर बुक केली होती. उदया उठून त्यानं सगळ्यांना सांगितलं की वहिनी आणि मी असं अधून मधून भेटायचो तर काय झालं असतं ? शिवाय त्यानंच काढून घेतलेले ते फोटो. ते समोर आल्यावर कोणी विश्वास ठेवला असता माझ्यावर ? बाकीच्याचं राहू दे आज तू आमचं दोघांचे बोलणं ऐकलं नसतंस तर तू विश्वास ठेवला असतास माझ्यावर? सांग ना ठेवला असतास का?

**सुजाता :**खरं आहे वहिनी. तुझ्या तोंडून सारं ऐकल्यावर कदाचित सगळ्यांच्या मनात काहीतरी वेगळंच आलं असतं. संशयाचा किडा डोक्यात वळवळायला लागला असता.

**उषा :**आणि मग त्यानं मला जगणंही अशक्य केलं असतं. तुला कल्पना नाही सुजाता.... ते... हॉटेलातल्या त्या प्रसंगानंतर रात्रीच्या रात्री जागून काढल्या आहेत मी. टेलिफोनची नुसती बेल वाजली तरी दचकायला होतं मला. त्याचा नुसता आवाज ऐकला तरी माझ्या मेंदूला झिणझिण्या येतात. तो नजरेसमोर आला की थरथर कापायला लागते मी. दिवसेंदिवस त्याची माझ्यावरील पकड घट्ट होत चाललीय. आणि मी आतल्या आत गुदमरून जातेय.

**सुजाता :**मला एका गोष्टीचं राहून राहून नवल वाटतंय. इतका छळ. इतक्या यातना इतका त्रास सोसूनही तू खंबीर राहिलीस. त्याला शरण नाही गेलीस. मला अभिमान वाटतो तुझा.

**उषा :**पण आता मात्र मी थकून गेलेय. शरीरानं आणि मनानंपण. एकदा वाटतं करून टाकावा या शरीराचा सौदा. आणि ह्या घराला, तुम्हाला, त्याच्या मगरमिठीतून

सोडवावं.

**सुजाता :** नाही वहिनी. असं मनात सुध्दा आणू नकोस. आता यापुढं काळजी करायची नाही. मी आहे ना तुझ्याबरोबर. आईला आणि दादाला दोघांनाही आपण सारं समजावून सांगू. आजच.

**उषा :** पण.

**सुजाता :** तुझ्या हातून भलतं सलतं काही घडलंच नाही तर कुणाला घाबरायचं काय कारण? मला मान्य आहे.. तुला एकटीला तोंड देणं जड गेलं असतं. पण आता तुझ्याबरोबर मी आहे. दोघींनी मिळून सारं सांगितल की साऱ्यांचा विश्वास बसेल. उद्या त्यानं मला हॉटेलवर बोलावलंय हे सांगितल्यावर तो काय लायकीचा माणूस आहे हे दादाला आणि आईलापण समजेल. [फोनची बेल वाजते.]

**सुजाता :** नक्की राहुलचा फोन.... भदेकाकाकडून केला असणार... [रिसीव्हर उचलते.] हॅलो.... राहूल.... बोल.... तुला सांगितलं ना माझी तब्बेत ठीक नाहीये. .. माझ्या पोटात दुखतंय.... जेवायची मुळीच इच्छा नाही. .. हो. . उषा वहिनी निघाल्या आहेत वर यायला. .. ठेवू. .? हो बाबा माझ्या नीट लक्षात आहे. हॉटेल ग्रीनपार्क. कॉफी शॉप. तिथं भेटायचं.... त्या नंतर तू सांगशील तिथं.... सांगशील तसं वागायचं.... प्रश्न विचारायचे नाहीत.... बरोबर? नाही. . कुणी नाही इथे.... आई तिच्या खोलीत जप करतेय. ओ.के.... उद्या बरोबर साडेतीन वाजता. आणि हे बघ, भदेकाकांकडचं जेवण आटोपून परत जाताना मी झोपलेली असले तर मला उठवायचं नाही. ओ के बाय.... [ठेवते.]

**उषा :** थोडा वेळ चलतेस का वरती?

**सुजाता :** नको वहिनी.. मला त्या माणसाचं तोंडही पहायची इच्छा नाही. तुम्ही जा. मला एकटीलाच राहू दे. आईला आणि दादाला सारं कसं सांगायचं याचा शांतपणे विचार करायला हवा मला.

**उषा :** एक पाच दहा मिनिटात आईकरिता वरून डबा घेऊन येते मी.

**सुजाता :** आपल्या दोघीत काही बोलणं झालं असेल याची जरासुध्दा शंका राहुलला येता कामा नये. काळजी घे. चेहऱ्यावर जरासुध्दा बेचैनी दिसू देऊ नको. [उषा जाते. सुजाता एकटीच विमनस्क बसलेली. थोड्याच वेळात आई येते.]

**आई :** तू नाही गेलीस भदेकाकांकडे?

**सुजाता :** नाही. माझी तब्बेत ठीक नाही.

**आई :** अगं थोडा वेळ तरी जाऊन ये. इतक्या आग्रहानं बोलावलं आहे. त्या दोघांना वाईट नाही का वाटणार?

**सुजाता :** बरं वाटलं की जाऊन येईन. वरतीच तर आहेत ते.

**आई :**हरी वरती गेलाय ना. शालूताईना मदत करायला? त्याला कदाचित् यायला उशीर होईल. माझ्या खोलीत तेवढा पाण्याचा जग् ठेवून दे .. [डोअरबेल वाजते.] कोण आलंय बघ गं.... [सुजाता दाराकडे जाते दार उघडते. दारात वासूला पाहून तिच्या तोंडून आश्चर्योद्‌गार. ]

**आई :**काय झालं गं?

**सुजाता :**(वासूला) आता काय काम आहे तुझं? मला उगाच घाबरवलंस. आई. वासू आहे ग...

**वासू :**[बाहेरच] संध्याकाळी चुकून दुसऱ्याच कस्टमरची रिसिट तुमच्याकडे दिली ती...

**सुजाता :**सकाळी ये. आता घरात कुणीही नाही.... [आत जाते.]

**आई :**तुला आणि उषाला दार उघडं टाकायची वाईट खोड आहे. केव्हातरी गोत्यात याल. [वासू आत येतो.] कुणीही येतं आणि सरळ आत घुसतं. कोण आहे हा? काय काम आहे त्याचं?

**सुजाता :**[बाहेर येत] अगं आपल्या नाक्यावर कॅसेट लायबरी आहे ना तिथं काम करतो हा

**वासू :**ती रिसिट बदली झाली ना म्हणून आता यावं लागलं.

**आई :**सकाळी नसतं येता आलं? सुजू, तू मालकाला फोन करून सांग अशी वेळी अवेळी माणसं पाठवत जाऊ नका म्हणून. [आत जाता जाता. .] सुजाता, तेवढं पाणी ठेवायचं विसरू नकोस ग. [आत जाते.]

**सुजाता :**नाही विसरत. वासू काय असेल ती रिसिट बिसिट ठेव तिथं टेबलावर आणि चालू पड.

**वासू :**घरात कुणीच नाही? [सुजाता चमकते.] म्हणजे मला आधी दिलेली रिसिट वापर पाहिजे. ती ही तुमची रिसिट.... संध्याकाळी दिलेली रिसिट.

**सुजाता :**ती शोधायला लागेल. ती उद्या. आज नाही.. .[जायला निघते. वासू अडवतो. ]

**वासू :**एक ग्लास पाणी मिळेल? तहान लागलेय...

**सुजाता :**तू काय मला तुझा नोकर समजलास? टेबलावर आहे पाणी. ते पी.. आणि चालायला लाग. [आत जाते. वासू सावधपणानं इकडे तिकडे नजर फेकतो. किचनकडे पहातो. नंतर हलकेच बेडरूमकडे जातो. आईला बाहेर येताना पाहून भिंतीला चिकटून उभा राहातो. त्या जवळ येताच. त्यांना बेडरूममध्ये ढकलतो. दार लावतो. थोड्याच वेळात. किचनमधून सुजाता बाहेर येते. बेडरूमच्या जिन्याच्या पायऱ्या चढता चढता तिची नजर बेडरूममध्ये जाते. तिच्या तोंडून किंकाळी बाहेर पडते. तिच्या हातून ग्लास जमिनीवर पडतो.

घाबरून ती किचनच्या दिशेने पळू लागते. वासू तिला पकडतो.]

**वासू :**ओरडू नकोस उगाच..

**सुजाता :**सोड मला. मला सोड.. जाऊ दे मला. .

**वासू :**घरात कोणी नाहीये. उगाच ओरडू नकोस

[तिच्या तोंडावर हात ठेवतो. ती चावा घेते. त्याच्या पकडीतून सुटते. बेडरूमच्या दिशेने पळू लागते. तिच्यापाठून येणाऱ्या वासूला पाहून.. ]

**सुजाता :**आ... ईऽ. आ.. .ईऽ [वासू जवळ येऊन पोहोचलाय.. ]

**वासू :**दरवाजा बंद आहे. बाहेरून बंद केलाय मी. तुझी आई आत आहे.

**सुजाता :**चालता हो इथून. चालता हो. माझ्या जवळ येऊ नकोस. डोंट टच मी. डोंट. [वासू तिला पकडतो.] बदमाशा, सोड मला. ..

[सुजाता त्याच्या हातून पुन्हा सुटते. धावते. हातात मिळेल ती वस्तू फेकून त्याला मारते. .]

**वासू :**तुला वाचवायला घरात कुणी नाहीयें. चल निमूट बेडरूमकडे नाहीतर ठार मारीन तुला. [सुजाता फ्लॉवरपॉट फेकून मारते.]

**सुजाता :**वाचवा वाचवा मला. आई, वहिनी, दादा. कुणीतरी या आणि सोडवा मला. मला जाऊदे. मला सोड. मी हात जोडते. पाया पडते तुझ्या.

**वासू :**तुला नाही मी असा सोडणार...

[तिला पकडतो. ती खुर्चीचा आधार घेते. तो खुर्ची खेचतो. ती खुर्ची सोडत नाही. त्याच वेळी ती खुर्चीवरोबर खेचली जाते. आईचा दरवाजावर धडका दिल्याचा आवाज. आरडाओरडा ऐकू येतो. झटापटीत सुजाताचे कपडे फाटतात. तिच्या प्रतिकाराने चिडलेला वासू तिचा गळा दाबतो. दाबत राहतो.]

**वासू :**मर. मर. . साली. नखरे करते साली. हरामी. मास्तर पाहिजे काय तुला. . ? घे घे.. [हिस्टरिकल होऊन गळा दाबत राहतो. तिचा प्राण जातो. ते लक्षात येताच तो थाबंतो. क्षणभर डेड पॉझ. दारावर खडखडाट वाढतो.] मेली. . सुजाता मॅडम मेली. मेली. मेमसाब. मेमसाब. [भानावर येतो. किचनच्या दिशेने पळतो. थोडयाच वेळात बाहेरून जेवणाचा डबा घेऊन उषा प्रवेश करते. पुढे येते. अस्ताव्यस्त पडलेली सुजाता पाहताच. तिच्या तोंडून किंकाळी फुटते. हातातला डबा पडतो. .]

**उषा :**सुजाता. सुजाता. आई आई. [किचनमधून धडपडल्याचा आवाज. ती किचनच्या दिशेने जाऊ लागते. तोच वासू बाहेर येऊन पळून जातो.] वासू वासू तू. ..?

**[अंधार : अंक दुसरा समाप्त]**

# अंक तिसरा [दृश्य – १]

[घराचा दिवाणखाना. सुजाताचा मृत्यू होऊन चार दिवस उलटले आहेत. एकूण वातावरण उदास]

**इ. पवार :** मिस्टर भदे, मिसेस देशमुखना हॉस्पिटलमधून डिस्चार्ज केव्हां मिळणार आहे ? त्या इथ केव्हां येणार आहेत ?

**भदे :** मला वाटतं दहा पंधरा मिनिटात त्या इथ यायला हरकत नाही. देशमुख स्वतः त्यांना आणायला गेले आहेत.

**राहुल :** तुम्हाला सांगायचा तसा मला काही अधिकार नाही. पण इन्स्पेक्टर मिसेस देशमुखांचे स्टेटमेंट आज नाही घेतलं तर नाही का चालायचं ? स्टेटमेन्ट देण्यासारखी त्यांची परिस्थिती नाहीये. मानसिक आणि शारीरिकसुध्दा.

**इ. पवार :** लुक, मिस्टर देसाई. या घरात एक दुर्दैवी घटना घडलीय. सुजातावर बलात्कार करायचा प्रयत्न होऊन त्यांचा खून झालाय. इटस नॉन कॉग्निजिबल ऑफेन्स. बरं गुन्हेगार कसा आहे? कोण आहे ? कुणालाच माहीत नाही.

**राहुल :** अहो पण आईनी स्टेटमेन्टमध्ये सांगितले आहे ना. की रिसिट देण्याचा बहाणा करून वासू नावाचा इसम इथं आला होता म्हणून.

**इ. पवार :** या वासूचा ठाव ठिकाणा पोलिसांना अजून मिळाला नाही आणि शिवाय वासूला या फ्लॅटमध्ये शिरताना पाहिलं असलं तरी गुन्हा केल्यावर निघून जाताना कुणीच पाहिलेलं नाही.

**राहुल :** त्या हरामखोरांनीच रूम बाहेरून लॉक केली..

**इ. पवार :** हा नुसता आपला तर्क आहे. एक अनुमान ! वासू बाहेर पडल्यावर कुणी तरी हे करणं सहज शक्य आहे. तरीही पोलीस वासूचा शोध घेतच आहेत.

**भदे :** काय शोध घेताहेत ? कपाळ ? गुन्हा घडून तीन दिवस झाले आणि पोलीस अजून शोध घेताहेत !

**इ. पवार :** तसं नाही साहेब.

**भदे :** पोस्ट मॉर्टमचा रिपोर्ट येऊन चोवीस तास झाले. सरळ सरळ ३०२ कलम लागेल असा नॉन कॉग्निजिबल ऑफेन्स होऊनही पोलिसांनी अजून एफ आय.आर तयार केला नाही

**इ. पवार :** मला माहिती आहे. आठवण करून दयायची काही गरज नाही. ही सारी घटना प्रत्यक्ष पाहिलेली एकच व्यक्ती आहे आणि ती म्हणजे मिसेस

देशमुख. त्यांनाही हॉस्पिटलमधून येऊ दे. त्यांचा जबाब घेतो आणि मग एफ.आय.आर तयार होईल. हा गुन्हा करताना किंवा गुन्हा करून पळून जाताना प्रत्यक्ष पाहणाऱ्या साक्षीदाराचं स्टेटमेन्ट घेतलं की तो एक सबळ पुरावा होईल.

**भदे :** इन्स्पेक्टर मला हे सारं सांगायची आवश्यकता नाही. कायदा मलाही समजतो. मी स्वत: ॲडव्होकेट आहे. प्रेताचा पंचनामा झाल्यावर पहिल्या प्रथम संशयिताला पकडायला हवं होतं.

**इ. पवार :** होईल. ते पण होईल. पोलीस धारावीपासून कोळीवाड्यापर्यन्त साऱ्या झोपडपट्ट्या पिंजून काढताहेत. उदयापर्यन्त पत्ता निश्चित लागेल. पण त्याआधी बाकीच्या कायदयाच्या फॉर्मिलिटीज पूर्ण झाल्या तर लगेच केस उभी करून आरोपीला कोर्टात उभं करता येईल.

**भदे :** व्हिडिओ लायब्ररीच्या मालकाकडून चौकशी नाही केली ?

**इ. पवार :** तुम्ही पोलिसांना काय समजता ? संशयित जिथं काम करतो, राहतो, जिथं त्याचं जाणं येणं असतं, त्या सगळ्या ठिकाणी पोलीस चौकशी केल्याशिवाय राहतील ? [टेलिफोनची बेल वाजते. इ. पवार फोन उचलतात] हॅलो. इन्स्पेक्टर पवार हिअर. काय ? कुठे सापडला हा हरामखोर? व्हेरी गुड. काय म्हणतोय ?. गुन्हा कबूल केला की नाही ? नाही म्हणतो ? आय सी.... म्हात्रेला फोन करून कन्फर्म करून घ्या. . भोसलेना सांगून त्याच्याकडे सापडलेल्या सगळ्या गोष्टींचा पंचनामा करा... आणि मग हॉस्पिटलमध्ये घेऊन जा. . मी तिथं पोचायच्या आत हे सारं आटोपून टाका. नारायणाला सांगा कुठं जाऊ नकोस. त्याला जीपमध्ये घालून इथं आणावं लागेल. ओळख परेडसाठी... येस... मी येतोच तिथं. [फोन ठेवतो]

**राहुल :** काय झालं ? वासू सापडला ?

**इ. पवार :** सापडला. पण गुन्हा कबूल करत नाहीये. म्हणतोय, 'कॅसेटची रिसिट देऊन मी तेथून निसटलो.

**भदे :** पण डॉक्टरी तपासणीत सुजाताबरोबर झालेल्या झटापटीत.

**इ. पवार :** एकझॅक्टली. मूर्ख आहे तो. त्याच्या शरीरावर झटापटीच्या असलेल्या खुणा आणि मिसेस देशमुखांची जबानी. तो नाही वाचू शकणार.

**आई :** त्याचं जे व्हायचं ते होईल. पण माझी तरणीताठी मुलगी सुजाता ती मला. ..

**भदे :** आई प्लीज. तुम्ही इतक्या खचून जाऊ नका.

**राहुल :** खरं म्हणजे तुम्ही उषा वहिनींना धीर दयायचा. तुम्हाला मन घट्ट करायला हवं.

**इ. पवार :** मी निघतो आता. वासूला घेऊन १५ मिनिटात मी परत येतो. मिसेस

देशमुखना यातलं काही सांगू नका. मी वासूला घेऊन येतोय हे तर मुळीच सांगू नका. त्या उगाच डिस्टर्ब होतील. वासूच्या बरोबर मी आलेला पाहून त्या नक्कीच त्याला ओळखतील. [जातात.]

**आई :** भदे. मला आत घेऊन चला. सूनबाईंची स्थिती मला पाहावयाची नाही.

**भदे :** ठीक आहे. [शालूताई आतून बाहेर येतात.] काय करते पिंकी ?

**शालू :** आजी हवीय म्हणते.

**आई :** गेल्या तीन रात्री शांतपणे झोपली नाही पोर. आज तरी लवकर झोपली तर बरं. [आतून पिंकी बाहेर येते.]

**पिंकी :** आजी तू आत चल ना. मला एकटीला करमत नाही ग. आजी, सुजू आत्या आता कधीही परत येणार नाही का गं ?

**आई :** हो ग. ती कध्धीच परत येणार नाही. मागच्या जन्मी काय पाप केलं होतं म्हणून या जन्मी हे भोग माझ्या नशिबी आले. चल पोरी आत चल. [पिंकीला घेऊन आत जाते.]

**शालू :** सुखानं ओसंडून जाणारं हे घर. आणि काय झालं हे ? नक्की कुणाची तरी दृष्ट लागलीय. [बाहेरून प्रभाकर आणि उषा यांचा आवाज ऐकू येतो.]

**प्रभाकर :** हं .सांभाळून. [दोघे आत येतात.]

**राहुल :** [उठून उभा राहातो.] या उषावहिनी. कसं वाटतंय आता? [उषा क्षणभर त्याच्याकडे रोखून पाहते आणि पुढे जाते.]

**भदे :** बरं झालं तुम्ही आलात. आई आणि पिंकी केव्हांपासून वाट पाहताहेत.

**उषा :** भदे, आता कुणालाही बोलवू नका. सुजाताविषयी नाही नाही ते प्रश्न ती मला विचारतील. निदान या क्षणी काही सांगण्याच्या मनःस्थितीत मी नाहीये. थोड्या वेळानं मी स्वतः त्यांच्यापाशी जाईन.

**भदे :** ठीक आहे [शालू आत जाते.]

**भदे :** [प्रभाकरला] जरा तुझ्याशी थोडंसं बोलायचंय. [दोघं थोडं बाजूला जातात.] हे बघ थोड्याच वेळात इथं [बाकीचे शब्द ऐकू येत नाहीत.]

**प्रभाकर :** राहुल तू बस जरा इथं. मी आलोच. उषा, जस्ट रिलॅक्स. आलोच मी थोड्याच वेळात. [दोघं आत जातात.]

**राहुल :** उषावहिनी.

**उषा :** अक्षरही बोलू नकोस. सुजाताच्या मरणानं तुला दुःख झालंय हे निदान मला तरी सांगू नकोस.

**राहुल :** मला खरंच दुःख झालंय उषा वहिनी. आणि माझं दुःख फक्त तुम्हीच समजू

शकाल सुजाताशी लग्न करून घरजावई होण्याचं स्वप्न होतं माझं. आणि एखादया संध्याकाळी या चार भिंतीआड तुमची घमेंड जिरवायचं दुसरं स्वप्न होतं एखादया कठपुतळीसारखं माझ्या हाताच्या बोटांवर तुम्हाला नाचवणार होतो मी. सुजाता मेली ती मेलीच पण त्याबरोबर माझ्याही स्वप्नांची राखरांगोळी करून गेली. आता तुम्हीच सांगा. माझ्याहून जास्त दुःख कुणाला होऊ शकेल ?

**उषा :** माणूस इतका नीच होऊ शकतो हे कधी कुणी मला सांगितलं असतं तर मी विश्वास ठेवला नसता. पण एका सैतानाचं रूप आज मी स्वतः ह्या डोळ्यांनी पाहतेय.

**राहुल :** कमाल आहे जो माणूस तुमच्यावर मनापासून प्रेम करतो, ज्याला तुम्ही तुमचा गुलाम करून ठेवलंय अशा एका गरीब माणसाला तुम्ही सैतान म्हणताय ? खरं म्हणजे तुमच्यापाशी माणुसकी नाहीये. नाहीतर माझी ही स्थिती पाहून तुम्ही केव्हाचं तुमची जिद्द सोडून दिली असती. पुन्हा एकदा विनंती करतो. शांतपणे विचार करा.

**उषा :** शटअप्. एक अक्षरही पुढं बोलू नकोस. माझ्या नजरेसमोरून चालता हो नाहीतर.

**राहुल :** नाहीतर काय ? सांगा ना नाहीतर काय ? एक गोष्ट लक्षात ठेवा उषावहिनी. आपल्या दोघांपैकी धमकी दयायचीच तर मी देऊ शकतो. तुम्ही नाही. इज इट क्लीअर ? माझ्याविषयी आणखी एक सांगतो. माझा स्वभाव फार विचित्र आहे. माझ्या जन्मापासून मला कुठचीच गोष्ट सहज मिळालेली नाही. आयुष्यात मी जे काही मिळवलं ते कुणाकडूनतरी हिसकावून घेऊन, फसवून मिळवलंय आणि अशा रीतीनं माझी प्रत्येक इच्छा, माझी प्रत्येक गरज मी पुरी करीत आलोय. लहान होतो तेव्हां गरजा, इच्छा, फार लहान होत्या. मोठा झाल्यावर गरजाही मोठ्या झाल्या. तुम्हाला आपलं करायची माझी इच्छा लक्षात ठेवा. मी ती निश्चित पुरी करीन. माझा स्वभाव अजून काडीइतकाही बदलेला नाहीये

**उषा :** तुला पुन्हा एकदा हात जोडून विनंती करते. तुझ्या डोक्यात राक्षस संचारलाय. वासनेनं तू आंधळा झालायस. अजून शुध्दीवर ये. नाहीतर तू आणि त्याच बरोबर आम्ही सारी जणं. सर्वांचच आयुष्य बरबाद होईल.

**राहुल :** मला माझी पर्वा नाही. आणि तुमचं आयुष्य बरबाद होऊ न देणं हे तुमच्याच हातात आहे. खरं म्हणजे माझ्यापुढे हात जोडायच्या ऐवजी तेच हात तुम्ही माझ्या गळ्यात टाकलेत तर आयुष्यभर तुमचा गुलाम होऊन राहीन मी. आणि नाहीतर काहीच नाही. एवीतेवी तुम्ही मला नराधम म्हणताच. तर मग नराधम म्हणजे काय हे तुम्हाला दाखवायला नको ? तुम्हाला मी सुखानं मरू पण देणार नाही! तुमच्या मरणाच्या वाटेतही मी धगधगते निखारे पसरीन मी अत्यंत

निर्दय माणूस आहे. हे पहा. नीट निरखून पहा. आपल्या बायकोचे असले फोटो पाहून थोडीशी लाज असलेला सामान्य माणूससुध्दा बायकोला एक क्षणभरही घरात ठेवणार नाही. तुमचं तर काय खानदानी घराणं. स्वत:च्या खर्चानं त्याच्या शेकडो कॉपीज काढून नातेवाईकांना पाठवायला मी तयार आहे.

**उषा :** नाही. नाही. [तो एकेक फोटो जमिनीवर फेकू लागतो. ती जीवाच्या करारानं एकेक उचलते.] तू हे काय चालवलं आहेस ? स्टॉप इट.

**राहुल :** [हसत] सारे बावन्नच्या बावन्न पत्ते आत्ता माझ्या हातात आहेत. फाडून फाडून किती फाडाल. तुमच्या मार्गाने हे काटे दूर करता करता रक्तबंबाळ होऊन, शेवटी थकून तुम्हाला माझ्या पायाशीच यावं लागेल.

**उषा :** नाही.

**राहुल :** आणि या धगधगत्या निखाऱ्यामधून चालतं जायचं नसेल तर माझी मागणी मंजूर करायची. याच निखाऱ्याची फुलं होतील. निर्णय आता तुम्हालाच घ्यायचाय मिसेस् देशमुख. माझ्या वाग्दत्त वधूचं सुतक मी फक्त तीन दिवस पाळीन. फक्त तीन दिवस. चौथ्या दिवशी मी माझी धमकी पूर्ण करीन. आणि हे शेवटचं. [पिंकी प्रवेश करते.]

**पिंकी :** मम्मी. [राहुलला पाहताच क्षणभर थबकते मग उषाकडे येऊन तिला मिठी मारते. राहुल क्षणभर रोखून पाहतो आणि बाहेर निघून जातो.] मम्मी तू केव्हां आलीस ? तुला काय झालं होतं ? मी तुझी किती वाट पहात होते.

**उषा :** आता मी ठीक आहे बेटा. तुझी मला खूप आठवण येत होती...

**पिंकी :** खरंच मम्मी ?

**उषा :** अगदी खरं.

**पिंकी :** पप्पा कुठायत ?

**उषा :** भदेकाका आणि पप्पा आत बोलताहेत.

**पिंकी :** मम्मी परवा किनई भदेकाकांनी इतकं छान पझल सांगितलं की माझी हसून हसून पुरेवाट झाली. एकदम फनी सांगू ?

**उषा :** सांग.

**पिंकी :** कमल आणि विमल बस स्टॉपवर उभ्या असतात. त्यांना ८६ नंबरची बस पाहिजे असते. ८६ येते. अगदी रिकामी विमल बसमध्ये चढते. पण कमल नाही चढत. कां ?

**उषा :** कां ? मला नाही बाई सांगता येत

**पिंकी :** अगं, अगदी सोपं आहे. बसवर लिहीलं होतं 'ओन्ली विमल.

**उषा :** पिंकी मला पण एक कोडं पडलंय. म्हणजे पझलं गं

**पिंकी :** मम्मी तुला आणि पझल ? सांग सांग मम्मी पटकन सांग. मला माहितीय का बघू.

**उषा :** तुला येईल सांगता ?

**पिंकी :** सांगून तर बघ.

**उषा :** खेळात भाग न घेता आपल्याला जिंकायचं असेल तर आपण काय करायला हवं ?

**पिंकी :** एक मिनीट मम्मी. [स्वतःशीच] खेळात भाग न घेता. आपल्याला जिंकायचं असेल तर काय करायला हवं.? [मोठ्याने] अगदी सोपं आहे मम्मी. खेळात भाग न घेता आपल्याला जिंकायचं असेल तर आपल्या ऐवजी आपल्याला जिंकून देईल असं दुसरं कुणी तरी खेळायला पाठवायचं. [खळखळून हसते आणि आत जाते. आतून प्रभाकर आणि भदे बाहेर येतात.]

**प्रभाकर :** मी सांगतो तिला समजावून. मला वाटतं. की आता ती स्टेटमेंन्ट देऊ शकेल. उषा थोडयावेळापूर्वी इथं इन्स्पेक्टर पवार आले होते. थोडयाच वेळात ते इथे परत येतील. कुणाला घेऊन. वासूला घेऊन. यू ओन्ली हॅव टू रेकग्नाईज हिम ॲण्ड गिव्ह अ स्टेटमेन्ट. [बाहेरून इ. पवार आणि वासूचा आवाज येतो. दोघेही आत येतात.]

**वासू :** आईच्यानं सांगतो साहेब. मी फक्त रिसिट दयायला आलो होतो. मी खरंच काही केलेलं नाही.

**इ. पवार :** तुझं थोबाड बंद कर. हो पुढं. उगाच टाईम वेस्ट करायचं काम नाही.

**वासू :** पण साहेब मी आलो तेव्हां मोठ्या मेमसाब घरात नव्हत्या.

**इ. पवार :** बदमाश साला. चूप.

**वासू :** मी इथं आलो होतो. साहेब, कबूल करतो. पण या बाईसाहेब. [उषाला पाहून पळून जाऊ लागतो. इन्स्पेक्टर त्याला पकडतात.]

**इ. पवार :** खोटं बोलू नकोस. जीभ हासडून काढीन. मिसेस देशमुखांनी तुला नाही पाहिलं मग तुझ्या बापानं तुला पाहिलंय काय ?

**वासू :** आपण काही गुन्हा केला नाही साहेब.

**इ. पवार :** साला पुन्हा खोटं ?

**उषा :** [शांतपणे] हा खरं सांगतोय इन्स्पेक्टर. [सारे स्तब्ध] [वासू डोळे फाडफाडून उषाकडे पाहातो.] खून करून पळून गेलेल्या माणसाचा चेहरा मी नीट पाहिलाय. हा तो माणूस नाहीये.

**इ. पवार :** काय.?

**प्रभाकर :** अग पण आईनी त्याला घरात शिरताना पाहिलं होतं.

**उषा :** आईनी त्याला घरात शिरताना पाहिलं असेल. पण मी याला घरातून पळून जाताना पाहिलं नाही

**इ. पवार :** आर यू शुअर मिसेस देशमुख ?

**उषा :** माझी खात्री आहे. इन्स्पेक्टर हा माणूस निर्दोष आहे. त्याला सोडून दया.

[अंधारः दृश्य समाप्त]

## अंक तिसरा [दृश्य – २]

[दिवाणखाना. वेळ संध्याकाळची.. प्रकाश येतो तेव्हां उषा फोनवर बोलत आहे....]

**उषा :** [फोनवर] हो... मी उषावहिनीच बोलतेय. मी तुला शरण आलेय राहुल... मी हरले. .. तू जिंकलास.... जीव दयायची किंवा जीव घ्यायची हिम्मत नाही माझी, कारण घरची अब्रू मला जास्त मोलाची वाटते. म्हणून माझं सर्वस्व मी तुला दयायला तयार आहे. या घराच्या सुखाच्या मार्गात तू जळते निखारे पेरलेस, त्यांच्या सुखाकरिता मला त्या जळत्या निखाऱ्यावरून चालत जायला हवं. माझ्या घराचं सुख त्यांची अब्रू सुरक्षित राहील.... तुझं सुख तू ओरबाडून घेशील आणि माझ्या वाट्याला येतील फक्त जळते निखारे.... पण मी ते स्वीकारणार आहे.... तुझी मागणी मला मंजूर आहे... उदया दुपारी साडेतीन वाजता. तेच हॉटेल.... तीच रूम... पण माझी एक अट आहे.... तुझी अट पूर्ण करायच्या आधी माझे सारे फोटो. निगेटीव्हज् सकट माझ्या हातात पडायला हवेत. ठीक आहे... मग हॉटेलची रूम बुक करून चावी माझ्याकडे पाठवून दे.... ओ.के. बाय.. [ड्रायव्हर प्रवेश करतो.]

**ड्रायव्हर :** गाडी आली आहे. आईनी मागवली होती. .

**उषा :** हां. .. त्या केव्हांपासून वाट पाहताहेत.. [बेडरूममधून आई प्रवेश करतात]

**आई :** आला का गं ड्रायव्हर. ?

**ड्रायव्हर :** हां. मी आलोय.

**आई :** उषा, अगं कित्येक दिवसात घराच्या बाहेरही पडली नाहीस. येतेस तर चल माझ्याबरोबर. ..

**उषा :** नको आई, शाळेतनं पिंकी यायची वेळ झालीय. घरात कुणीतरी रहायला हवं. ..

**आई :** सुजाता होती तेव्हां मुलीची काही काळजी नव्हती.... [डोळे पुसते] थोडा कमी अधिक उशीर झाला तर काळजी नको करूस. ड्रायव्हर आहे बरोबर.... [जाते.]

[उषा शांतपणे कोपऱ्यातल्या एका खुर्चीवर बसून राहते. ती कुणाची तरी वाट पाहात आहे. थोडयाच वेळात वासू प्रवेश करतो.]

**वासू :** [हलक्या आवाजात] मेमसाब,

**उषा :** ये वासू. [ वासूला आवाज कुठून येतोय हे समजत नाही. तो चमकतो.. .] घाबरायचं कारण नाही. घरात कुणी म्हणजे कुणी नाही. बैस. [एखादया आज्ञाधारक मुलाप्रमाणे वासू उषानं दाखविलेल्या खुर्चीवर बसतो.] त्या रात्रीसारखी दाराला आतून कडी लावून नाही घेणार ? [वासू दचकून उभा राहतो. उषा हसंते....] असा सारखा घाबरून उभा नको राहूस. दार बंद कर... नाहीतर करू नकोस. आता इतक्यात कुणी येणार नाही. मुलगी शाळेत गेलीय, मिस्टर ऑफीसात गेलेत, नोकर बाहेर गेलाय, माझ्या सासूबाई बाहेर गेल्यात आणि सुजाता. .. [पुन्हा जोराने हसते.]

**वासू :** ही तुम्ही काय थट्टा चालवलीय. .?

**उषा :** आज विचारलं नाहीस, एक ग्लास पाणी मिळेल ?

**वासू :** हे पहा मेमसाब...

**उषा :** आज तुला असं काहीच विचारायची गरज नाही. पाणी पिण्याच्या बहाण्यानं घरात थांबून रहायचं, सुजाता पाणी देताना तिला स्पर्श करायचा प्रयत्नं करायचा, आता काय तो प्रश्नच नाही.

**वासू :** हे तुम्ही काय....

**उषा :** जिच्याकरता काहीना काही निमित्त काढून तू वारंवार यायचास ती आज जिवंत नाहीये.

**वासू :** बाईसाहेब, मी तुमच्या पाया पडतो पण.

**उषा :** त्या रात्री सुजातासुध्दा अशीच तुझ्या पाया पडली असेल. तुला विनवण्या केल्या असतील. तडफडली असेल. तुझ्यात संचारलेल्या सैतानाच्या मगरमिठीतून सुटायचा जीवाच्या आकांतानं प्रयत्न केला असेल.

**वासू :** तुम्ही कुठल्या रात्रीविषयी बोलताय ?

**उषा :** ती रात्र.. ज्या रात्री तू सुजातावर बळजबरी करायचा प्रयत्न केलास. ती रात्र. .

**वासू :** पण...

**उषा :** ती रात्र. ज्या रात्री तू तिचा गळा दाबून खून केलास ती रात्र. जेव्हां तू खून करून माझ्या डोळ्यादेखत जीव वाचवण्याकरिता पळून गेलास ती रात्र. त्या रात्री विषयी बोलतेय मी. .

**वासू :** पण त्या दिवशी तुम्ही पोलिसांना मी 'तो' नसल्याचं सांगितलंत. तुमचे फार

उपकार आहेत माझ्यावर. मला फार शरम वाटतेय स्वतःची. मला माफ करा.

**उषा :** घरात जबरदस्तीनं घुसून, एका निर्दोष निरागस मुलीवर बलात्कार करण्याच्या प्रयत्नात, तीचा जीव घेणाऱ्या कृत्याला काय शिक्षा आहे तुला माहित आहे ?

**वासू :** हो... हो... बाईसाहेब. .

**उषा :** फाशी.... मरेपर्यन्त फाशी ! गळ्याभोवती फास आवळत गेला की काय वाटतं ते अनुभवलंयस तू ?

**वासू :** नाही बाईसाहेब मला माहीत नाही.

**उषा :** त्या दिवशी माझ्या मानसिक परिस्थितीमुळे मी तुला ओळखू शकले नाही. पण आज मला बिनचूक आठवतंय. त्या रात्री सुजाताचा गळा दाबून खून करणारा तूच होतास.... वासुदेव गणेश नाईक. मी फक्त इन्स्पेक्टरना फोन करायचा अवकाश, की, "इन्स्पेक्टर गुन्हेगाराला मी ओळखलंय.. . तो वासूच होता...."

**वासू :** तुम्ही म्हणाल तर मी नोकरी बिकरी सोडून देतो. मुंबई सोडून गावी जातो. तुम्ही म्हणाल तसं करतो. पण मला वाचवा..

**उषा :** राहुल देसाई हे नाव ऐकलयस तू. .. ?

**वासू :** [काही क्षण गप्प] राहूल देसाई ? म्हणजे तुमच्याकडे येणारा तो मास्तर....?

**उषा :** हॉटेल ग्रीन पार्कच नाव ऐकलंयस तू ?

**वासू :** हो. तिथं काही काम आहे का तुमचं ?

**उषा :** उदया दुपारी तीन वाजता. .. हॉटेल ग्रीन पार्क, रुम नंबर १०७, तिथं जायचं. काउंटरवर कुणालाही न भेटता. कुणाशीही काही न बोलता सरळ रूमवर जायचं. तुला कुणीही ओळखणार नाही. थोडासा मेकअप करायलाच लागेल एवढंच. म्हणजे खोटी दाढी मिशा... बस्स.

**वासू :** पण ही काय भानगड आहे बाईसाहेब.. ?

**उषा :** घड्याळात बरोबर साडेतीन वाजलेले असतील. त्या रूमच्या उघड्या ठेवलेल्या दारातून राहूल देसाई आत येतील. हातात एखादी बॅग, पार्सल, किंवा पाकीट असेल. तू दाराच्या आड लपलेला असशील. तो आत शिरताच तू त्याच्यावर झडप घालून त्याला पकडशील आणि त्याला. . त्याला.

**वासू :** पण का ? त्या मास्तरचा मी खून का करायचा ?

**उषा :** खून केल्यावर इथून जसा पळून गेलास तसा तिथून पळून जाणार नाहीस. अगदी शांतपणे आरामात काहीच घडलंच नाही असं समजून त्या खोलीतून बाहेर पडशील...

**वासू :** हे पहा बाईसाहेब,

**उषा :** आणि बाहेर पडताना राहूलच्या हातातलं पाकीट, पार्सल किंवा बॅग जे काही

असेल ते घ्यायला विसरणार नाहीस..

**वासू :** नाही आपण नाही जाणार. आपल्याला नाही असं जमायचं...

**उषा :** आणि रात्री बरोबर साडेअकरा वाजता या घरातली सारी माणसं झोपलेली असतील तेव्हां इकडे येशील आणि पार्सल मला देशील...

**वासू :** तुम्ही काय समजता मला ? आपण नाही करणार हे मर्डर वगैरे....

**उषा :** कां ? गळा दाबायची प्रॅक्टिस तुला आहेच....

**वासू :** पण मी हे असं का करायचं ?

**उषा :** तुझ्या गळ्याभोवतालच्या फासातून निसटण्यासाठी.... जिवंत राहण्याकरिता. सुजाताच्या खूनाबद्दल तू कुठंही अडकला जाऊ नयेस म्हणून....

**वासू :** म्हणजे... ?

**उषा :** म्हणजे एकच. तुला जिवंत राहायचं असेल तर राहुलला मारायलाच हवं.... म्हणजेच त्याला मारायला हवं..... त्याचा जीव माझ्या पदरात टाक. तुझा जीव मी तुझ्या पदरात टाकीन.

**वासू :** पण हे तर ब्लॅकमेलींग झालं....

**उषा :** ब्लॅकमेलींग ह्या शब्दाचा अर्थ माहीतीय तर तुला ? मी तर खूप जवळून ओळखतेय या शब्दाला. या शब्दातलं प्रत्येक अक्षर प्राण शोषून घेतं माणसाचा. आपली मगरमिठी क्षणाक्षणानं आवळत जातो हा शब्द. माणूस मरतही नाही आणि जिवंतही राहू शकत नाही. आणि मग कधीतरी त्या गुदमरल्या अवस्थेतच माणूस नष्ट होऊन जातो. पण मला असं नष्ट नाही व्हायचं. या सापळ्यातून मला माझी सुटका करायची आहे. आणि आणि म्हणून तू मला मदत करणार आहेस.

**वासू :** माझ्याच्याने हे नाही व्हायचं.

**उषा :** सुजाताच्या बाबतीत मी गप्प राहीन. आणि राहुलच्या बाबतीत कुणालाही तुझा संशय येणार नाही... नाही मान्य ? ठीक आहे. तू जा मग. पळ. .. पळ. कितीही लांब जा.. पण पोलिसांपासून किती लांब पळू शकशील ? आणि किती काळ ?

**वासू :** ठीक आहे मी तयार आहे जायला.

**उषा :** बरोबर तीनच्या ठोक्याला पोच तिकडे. तो तिकडे साडेतीनला येणार आहे.

**वासू :** हे पहा बाईसाहेब, काही भानगड नाही ना होणार ? नाहीतर मी फुकटात....

**उषा :** तू मुळीच काळजी करायची नाहीस. सगळं व्यवस्थित ठरलेलं आहे. वेळही फिक्स झालीय. रूमची चावी तुला उदया मिळेल.

**वासू :** मी जातो. उदया रात्री साडेअकरा वाजता तुम्हाला भेटतो ते पार्सल घेऊन.

**उषा :** दाढी मिशा लाव म्हणजे बिल्डींगचा वॉचमन तुला ओळखणार नाही. हे घे. [शंभर रूपयांची नोट देते.] असू देत तुला लागेल तर.... [वासू पैसे घेऊन वेगाने निघून जातो. उषाच्या तोंडावर विजयी हास्य.] खेळात भाग न घेता आपल्याला जिंकायचं असेल तर आपल्या ऐवजी आपल्याला जिंकून देईल असं दुसरं कुणीतरी खेळायला पाठवायचं.... [हसते....]

**[अंधार : दृश्य समाप्त]**

## अंक तिसरा [दृश्य – ३]

[रंगमंचावर प्रकाश येतो तेव्हां रात्रीचे अकरा वाजून गेले आहेत.. . उषा आतुरतेने वासुची वाट पाहात आहे. थोडयाच वेळात वासू दबकत दबकत प्रवेश करतो.]

**वासू :** [धापा टाकीत. ] बाईसाहेब, काम झालं आपलं. खतम करून टाकलं साल्याला. रूममध्ये आल्यावर पाठीमागून उडी टाकली आणि गळाच पकडला. त्याला आवाज काढायला पण टाईम नाही मिळाला. हे घ्या आपलं पार्सल. मी निघू... ?

**उषा :** इथं येताना तुला कुणी पाहिलं ?

**वासू :** नाही.

**उषा :** छान. काम फत्ते केल्याबद्दल बक्षिसी दिली पाहिजे तुला. बस... [बोलता बोलता पार्सल कपाटात ठेवते.. ]

**वासू :** मी जातो. मला बक्षिसी वगैरे काही नको.

**उषा :** दहा हजार. दहा हजार रूपये देणार आहे मी तुला. ते घ्यायचे आणि तू तुझ्या गावाला निघून जायचं. पुन्हा मुंबईत पाऊल टाकायचं नाही. तुझा मार्ग वेगळा माझा मार्ग वेगळा.

**वासू :** दहा हजार ? ठीक आहे बाईसाहेब, तुम्ही देताय एवढं तर घेतो. पण आटपा लवकर. मला इथून जाऊ दे लवकर..

**उषा :** एवढी घाई कशाला ? जायचंच आहे. हे घे तुझे पैसे मोजून घे... [वासू पैसे मोजू लागतो.]

**वासू :** थँक्यू बाईसाहेब. मी उदयाच्या उदया मुंबई सोडतो. पुन्हा तोंड नाही दाखवणार.... [बंडलात मोजता मोजता त्याला कागदाचे तुकडे आढळतात.] हे काय पैसे कुठे आहेत ? कुठे आहेत पैसे ? [उषा एक किंकाळी फोडते ]

**उषा :** प्रभाकर.. प्रभाकर.... हरी... धावा. .. धावा... लवकर या... लवकर या.... तो खुनी इथं आलाय.... तो खुनी इथं आलाय पुन्हा.... अशीच दाढी होती त्याची. .. धावा धावा लवकर....

**प्रभाकर :** [धावत येतो.] काय झालं उषा ? काय झालं ? हा कोण इसम ?

**वासू :** हा काय तमाशा चालवलाय ?

**उषा :** हाच तो माणूस.... इन्स्पेक्टरांनी पकडून त्याला इथं आणलं तेव्हां मी त्याला ओळखू शकले नाही. कारण तेव्हां दाढी नव्हती. पण आज दाढी लावून आल्यावर त्याला मी ओळखलं. हाच तो इसम. यानंच सुजाताचा त्या दिवशी खून केला...

**प्रभाकर :** निमूटपणे स्वाधीन हो. नाहीतर मी तुला....

**वासू :** नाही. हा सारा बनाव आहे. या बाईनं मला फसवलंय. मी नाही तिला सोडणार.... [वासू पळून जायचा प्रयत्न करतो. हरी त्याच्यावर झडप घालून त्याला पकडतो. त्याच्यावर ताबा मिळवतो.] मला सोडा.... या बाईनं मला फसवलंय.... [तो जोरात ओरडतो.]

**प्रभाकर :** [फोनवर] इन्स्पेक्टर.... सुजाताच्या खुन्याला आम्ही गिरफ्तार केलाय. [हळू हळू अंधार.... प्रकाश झोत फक्त उषावर....]

**उषा :** नाही वासू मी तुला फसवले नाही. ज्या क्षणी तू सुजाताचा खून केलास त्याच क्षणी तू फाशीच्या दोरात फसलास. त्यातून तू कधीच सुटणार नव्हतास. मी फक्त आणखी एक खून घडवला तुझ्या हातून. कारण मी स्वतःच फसले होते. माझ्या चांगुलपणानं मला फसवलं, माझ्या निर्मळ मनानं मला फसवलं. तेही मी सहन केलं असतं पण माझा संसारच अधळायला लागला तर मी तरी काय करू ? कदाचित् मी.... मी.... खुनीही असेन पण माझा इलाज नव्हता त्याला. माझा इलाजच नव्हता.

**[अंधार : दृश्य समाप्त : अंक समाप्त]**

IRBK-0123769